दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com
• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव • लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१८४ | बुधवार दि.२३ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये



# शेतीच्या नुकसानीसंदर्भात उद्यापासून पंचनामे करण्याचे आदेश

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात गेल्या दीड महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी हवालदील झाला आहे. शेतातील खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून सोयाबीन वाळून गेलाय. मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे सर्वाधिक नुकसान झाल्याचं प्रथमदर्शनी दिसून येते. त्याच पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांकडून नुकसान भरपाई जाहीर करण्याची मागणी केली जात आहे. राज्यात दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी विरोधकांकडून केली जात आहे. तर, विविध शेतकरी संघटनाही रस्त्यावर उतरत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर आज मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी माध्यमांना माहिती दिली.**



शेतकऱ्यांच्या शेतीच्या नुकसानीसंदर्भात उद्यापासून पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत, त्यासाठी फिल्डवरुन माहिती गोळा केली जाईल. बहूतांश भागात पीकं करपली आहेत. सोयाबीन आणि कापूस पिकांवर सर्वाधिक परिणाम झाला आहे, कोकणात भातावर परिणाम झाला आहे, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंचनाम्याचे आदेश दिल्याची माहिती दिली. विशेष करुन पिण्याचं पाणी आणि जनावरांचा चारा यावर लक्ष द्यायच ठरलं आहे. महापालिका, नगरपालिका आणि पंचायत राज संस्था यांच्याकडे पिण्याच्या पाणीसंदर्भातील निर्णय दिले आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. गिरीश महाजन, गुलाबराव पाटील, पंकजा मुंडे, बाबासाहेब पाटील अन्य मंत्री असतील, समितीचे सचिव हे मुख्य सचिव असतील, दुष्काळ संदर्भात अपडेट या समितीकडे दिले जातील. या उपसमितीला अधिकार दिले ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### राहुल गांधींच्या फोननंतर भाजप प्रवेश थांबला

मुंबई : काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी फोनवरुन संवाद साधल्यानंतर बुलढाण्यातील चिखली विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार काँग्रेस नेते राहुल बोंद्रे यांच्या भाजपमधील प्रवेशाला ब्रेक लागला आहे. काँग्रेसमध्ये राहणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. दरम्यान, यावर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राहुल बोंद्रेंवर केसेस टाकण्यात आल्या होत्या. त्यांना अडचणीत टाकण्यात आलं होतं. हतबल होऊन त्यांनी हा निर्णय घेतला होता असे सपकाळ म्हणाले. त्या ठिकाणच्या भाजपच्या स्थानिक आमदारांनी त्यांच्या अनेक चौकशी त्यांच्या लावल्या होत्या असेही सपकाळ म्हणाले.

### मेथीच्या भाजीवर ५० रुपयांचा दंड

मुंबई : मिरा-भाईंदर पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. पर्यषण काळाच्या नावाखाली आता शालेय विद्यार्थ्यांवर अजब बंधने घालण्याचा प्रकार आता सुरू झाला आहे. काही दिवसांपूर्वी भाईंदरचे भाजप आमदार नरेंद्र मेहता यांच्या शाळेत विद्यार्थ्यांना डब्यात कांदा, लसूण, बटाटा, बीट, कंदमूळ आणण्यास बंदी घातली होती. शाळेच्या कँटिनमध्येही यावर बंदी घातली होती. पर्यषण काळातील अजब फतव्यावरून राज्यभरातून एकच टीका झाली. त्यानंतरही मीरा-भाईंदरमध्ये अजब फतवे सुरूच आहे. आता तर शाळेत डब्यात मेथीची भाजी आणल्याने एका विद्यार्थ्याला ५० रुपयांचा दंड ठोठावल्याची घटना घडली आहे. मीडिया रिपोर्टनुसार, विद्यार्थ्याने मेथीची भाजी आणल्यानंतर कॅन्टिनमधून दुसरी भाजी घेण्यास भाग पाडलं. त्यानंतर या विद्यार्थ्याकडून २० रुपये आकारल्याचे सांगण्यात येत आहे.

### जन आक्रोश' मोर्च्यात अहिल्यानगरमध्ये राडा

अहिल्यानगर :अहिल्यानगरमध्ये मोठा राडा झाला आहे. अहिल्यानगरमध्ये वीज प्रश्नी जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात आला. परंतु यावेळी प्रांताधिकारी कार्यालयात नसल्याने मोर्चेकरी संतप्त झाले. आंदोलकांनी खाली या खाली या असे म्हणत घोषणाबाजी केली. यावेळी आंदोलकांसहित बाळासाहेब थोरात यांचाही पारा चढला. त्यानंतर बाळासाहेब थोरात हे प्रांत अधिका-यांवर भडकल्याचे दिसून आले.अहिल्यानगरमध्ये आंदोलनादरम्यान बाळासाहेब थोरात यांनी प्रांत अधिका-यांवर राग व्यक्त केला. थोरात म्हणाले, आमदार शिव्या देतो म्हणून त्याचे गुलाम झालात का? दादागिरीने तुम्ही गुलाम होत असाल, तर लोके तेच करतील.आमदाराचा फ्लेक्स लावायला तुम्ही कशाला जायचे? असे प्रश्न करत थोरात अधिका-यांवर संतापले.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**
**बीड, दि.२० सप्टेंबर २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८५.५० क्विंटल | २,७५० | ३,१२० | २,८९३ |
| ज्वारी/हायब्रिड: १२८.५० क्विंटल | २,९५० | ५,५०४ | ४,००९ |
| मका/लोकल: ३२.०० क्विंटल | २,७२४ | २,७२४ | २,७२४ |
| तूर : ५.५० क्विंटल | ४,००० | ८,५०० | ७,४३७ |
| उडीद : १८.०० क्विंटल | ८,४९० | ८,७११ | ८,६०२ |
| बाजरी: ८.५० क्विंटल | २,६२८ | २,९१५ | २,८०५ |
| मुग: ५.०० क्विंटल | ९,१९० | ९,६०१ | ९,३९३ |
| सोयाबीन: ३.५० क्विंटल | ५,७८५ | ५,८४० | ५,८१२ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,५०० | ६,००० | ५,७३३ |

# विधानपरिषदेच्या पाच जागांसाठी निवडणूक जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात पुन्हा एकदा निवडणुकीचा धुरळा उडणार असून निवडणूक आयोगाकडून विधानपरिषदेच्या पाच जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील ५ जागांसाठी निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली असून यामध्ये छत्रपती संभाजीनगर , पुणे, नागपूर विभाग पदवीधर तसेच अमरावती आणि पुणे विभाग शिक्षक



मतदारसंघांचा समावेश आहे.

विधानपरिषदेच्या या निवडणुकीसाठी २९ सप्टेंबर रोजी अधिसूचना जारी होणार असून उमेदवारी अर्जाची अंतिम मुदत ६ ऑक्टोबर ▶▶ पान २ वर

# हायकोर्टाचे निर्देश; सार्वजनिक ठिकाणी फटाके वाजवण्यास बंदी

**मुंबई । प्रतिनिधी**

ध्वनी प्रदूषणाच्या मर्यादा ओलांडणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश मुंबई हायकोर्टाने दिले आहेत. ध्वनी आणि वायू प्रदूषणाच्या मुद्द्यावरुन मुंबई हायकोर्टाने स्वत:हून सुमोटो याचिका दाखल करुन घेतले आहे, त्यावर आज मंगळवारी तातडीने सुनावणी घेतली.

मुंबई हायकोर्टाने या प्रकरणी



सविस्तर सुनावणी घेतल्यानंतर सार्वजनिक ठिकाणी फटाके वाजवण्यास बंदीचे तोंडी आदेश दिले आहेत. तसेच मिरवणुकीवेळी आवाज वाढवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सिलेंडरवरही बंदी घालण्यात आली आहे. तसेच लाऊड स्पीकरसाठी परवानगी दिली जाईल. ही परवानगी मिळाल्याचे पत्रक दर्शनीय भागामध्ये लावावे लागेल. अन्यथा त्यांना लाऊड स्पीकर लावता येणार नाहीत. किंवा त्यांचे उपकरणं जप्त होतील, असेही हायकोर्टाने तोंडी आदेशात स्पष्ट केले आहे. उत्सवांच्या काळात सार्वजनिक रस्ते ▶▶ पान २ वर

# केंद्राकडून प्रत्येक कार्यालयाला ५० लाखांचे अनुदान


**मुंबई । प्रतिनिधी**



**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून अस्तित्वात आलेल्या मॉडेल नोंदणी कार्यालयांच्या उपयोगितेची दखल केंद्र सरकारने घेतली असून, पुणे येथे सुरू झालेले मॉडेल नोंदणी कार्यालय आता देशभर प्रारंभ करण्याचे निर्देश केंद्रीय ग्रामीण विकास व पंचायत राज मंत्रालयाच्या भूमी संसाधन विभागाने दिले आहेत.**

विशेष म्हणजे, केंद्रीय भू-संसाधन विभागाचे सचिव नरेंद्र भूषण यांनी अशी कार्यालये देशभर सुरू करण्यासाठी प्रत्येक कार्यालयासाठी ५० लक्ष रुपयांच्या निधीची ▶▶ पान २ वर

# परतीचा पाऊसही नाही; महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट



**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात सध्या दुष्काळाचे गडद सावट पसरले असून शेतकरी गंभीर संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन केली असली, तरी आता

**सध्याच्या आकडेवारीनुसार मध्य महाराष्ट्रातील सोलापूर, सांगली, सातारा तसेच छत्रपती संभाजीनगरचे काही तालुके वगळता संपूर्ण मराठवाडा, विदर्भातील बहुतांश जिल्हे आणि कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात पावसाची तूट अत्यंत मोठी असून दुष्काळसदृश परिस्थिती गंभीर बनली आहे.**

परतीचा पाऊस तरी दिलासा देणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र, सध्या सुरू झालेला परतीचा पाऊस हा सार्वत्रिक नसून केवळ स्थानिक स्वरूपाचा आहे. त्यामुळे या पावसाने राज्यातील दुष्काळाचे संकट टळणार नसून खरीप पिकांनाही फारसा दिलासा मिळणार नाही, असा स्पष्ट अंदाज हवामान शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी व्यक्त केला आहे. ▶▶ पान २ वर

# दिवाळीपूर्वीच महागाईचा बॉम्ब फुटणार

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

दसरा आणि दिवाळीपूर्वी देशात खाद्यतेलाच्या किमती वाढू शकतात. वाढत्या आयात खर्चामुळे कंपन्यांच्या नफ्यावर दबाव येत आहे. परिणामी, खाद्यतेल कंपन्या अंदाजे ७-८% दरवाढीचा विचार करत आहेत. सुधारित पुरवठा आणि आयात शुल्कात संभाव्य कपात यामुळे ही वाढ मर्यादित राहू शकते.

जर कंपन्यांनी किमती वाढवल्या, तर मार्च




महिन्यापासून खाद्यतेलाच्या किमती वाढण्याची ही तिसरी वेळ असेल. फायनान्शियल एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, कंपन्यांनी यापूर्वी मार्च ते जून दरम्यान दोन टप्प्यांत अंदाजे ५-६% दरवाढ केली होती, ज्यामुळे त्या काळात खाद्यतेलाच्या किमतीत एकूण १०-१२% वाढ ▶▶ पान २ वर

# मनोज जरांगेंचे प्रामाणिक आंदोलन आणि 'चांडाळ चौकडी'चा विळखा

## बदनामी पाटलाची! टिककरांचे चुकते तरी काय? मराठा आरक्षणाचा लढा वेगळ्याच वळणावर

**विशेष प्रतिनिधी । बीड**

**कधी नव्हे तो संपूर्ण मराठा समाज एकवटला, लाखोंचे मोर्चे निघाले आणि एका साध्या माणसाच्या हाकेला प्रतिसाद देत गाव-खेड्यातील गरीब मराठा आपल्या हक्काच्या आरक्षणासाठी रस्त्यावर उतरला. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाच्या वेदनेला वाचा फोडली, याबद्दल समाजात तीळमात्र शंका नाही. कित्येक वर्षांनंतर समाजातील गोरगरीब मुलांच्या पदरात काहीतरी पडेल, न्याय मिळेल अशी आशा निर्माण झाली होती. मात्र, आज आंदोलनाची अवस्था पाहता वारंवार घेतली जाणारी माघार, सत्तेच्या सारीपाटावर सुरू असलेला खेळ आणि आजूबाजूच्या चौकडीवर होणारे गंभीर आर्थिक आरोप यामुळे आंदोलनाची मूळ दिशा भरकटत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.**

ज्या वेळी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी अंतरवली सराटीतून आंदोलनाची हाक दिली, तेव्हा केवळ मराठाच नव्हे, तर मुस्लिम, वंचित आणि ओबीसी घटकांतील अनेक प्रामाणिक लोकांनीही या लढ्याला नैतिक पाठिंबा दिला होता. गरीब मराठ्यांचे भले व्हावे हीच सर्वसामान्यांची भूमिका होती. परंतु, जसजसा लढा पुढे सरकला, तसतसे आंदोलनाला एकांगी वळण लागले. भावनिक उद्रेकातून इतरांना दूर लोटले गेले आणि मराठा विरुद्ध ओबीसी असा सामाजिक संघर्ष पेटवला गेला. विशेषतः बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात या संघर्षाचे पडसाद उमटले. एकात्मतेच्या पायावर उभ्या राहिलेल्या आंदोलनात सामाजिक दरी वाढली, हे या लढ्याचे पहिले मोठे नुकसान ठरले. यापूर्वी देखील मराठा आरक्षणासाठी प्रामाणिकपणे आंदोलन आणि प्रयत्न झाले त्यामध्ये स्वर्गीय अण्णासाहेब पाटील स्वर्गीय विनायक रावजी मेटे यांचे योगदान विसरता येणार नाही स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांनी समाजासाठीच आपले जीवन अर्पित केले तर स्वर्गीय विनायकराव मेटे यांचा देखील मराठा आरक्षणाच्या बैठकीला जात असताना दुर्दैवी अपघाती निधन झाले ते देखील समाज विसरला नाही मात्र त्यांच्या पत्नी डॉक्टर ज्योती मेटे यांनी जरांगे पाटील यांना भाऊ समजून दिलेला सल्ला त्यांच्याच आजूबाजूच्या मंडळींनी वेगळ्या पद्धतीत घेऊन त्यांनाच ट्रोल केले गेले हे अनेकांना पटलेले नाही, अशातही या आंदोलनाला विरोध करणारी मंडळी काही बाहेरची नव्हती ती समाजाचीच होती मात्र आता त्यात मोठ्या प्रमाणात भर पडल्याचे दिसत आहे याचे कारण जरांगे पाटील यांच्या अवतीभोवतीची मंडळी आहे त्यांचे कारनामे बाहेर पडू लागले नुकत्याच घडलेल्या घडामोडींमध्ये, अजय महाराज बारस्कर यांनी थेट केंद्रीय यंत्रणांकडे (ईडी) धाव घेत आंदोलनाच्या नावाखाली सुरू असलेल्या आर्थिक गैरव्यवहारांची तक्रार केली. यानंतर सोशल मीडियावर आणि राजकीय वर्तुळात अनेक तथाकथित 'समर्थक' आणि कारभाऱ्यांचे कारनामे चव्हाट्यावर येऊ लागले आहेत.आंदोलनाचा वापर करून कंत्राटदार, गुत्तेदार आणि कंपन्यांवर दबाव आणून कोणी स्वतःचे खिसे भरले?अशा प्रश्नांचे व्हिडिओ आणि कथित पुरावे आता उघडपणे लोकांसमोर येत आहेत. एकेकाळी आंदोलनावर तोंड उघडायला घाबरणारे लोक आता उघडपणे बोलू लागले आहेत. त्यामुळे अशा वेळी "टीकाकारांचे काय चुकते?'' हा प्रश्न रास्त वाटू लागतो. टीका पाटलांच्या हेतूवर कमी आणि त्यांच्या आजूबाजूला जमलेल्या 'चांडाळ चौकडी'वर जास्त होत आहे. आणखी देखील वेळ गेलेली नाही आजही समाजाचा विश्वास म्हणून जरांगे पाटील यांच्यावर आहेच परंतु आजूबाजूच्या एका एकावर असे आरोप झाले आणि ते सोशल मीडियाच्या माध्यमातून पुढे येऊ लागली तर विश्वास ढळू नये म्हणून सावध पावले उचलण्याची गरज देखील तेवढीच आहे ,व्यक्ती म्हणून नाही तर समाज म्हणून कठोर निर्णय घ्यायला हरकत नाही आज मनोज जरांगे पाटील यांची भिस्त म्हणून पुढे येणाऱ्या



अनेकांचे कारणाने पुढे येत आहेत पूर्वी आरोप केले तर त्याला सडेतोड उत्तर दिले जात होते आता आरोपाबरोबर पुरावे दाखवले जातात त्यामुळे जनतेलाही यामध्ये सत्य आहे असे वाटू लागले आहेत मग त्याचाही लाभ पाटलांना मिळतो की काय अशी शंका यायला वेळ लागत नाही, त्यामुळे पाटील आपण प्रामाणिक आहात म्हणूनच जनतेचा आपल्यावर विश्वास आहे परंतु ही अशीच परिस्थिती राहिली तर आपल्या आजूबाजूचे गडर होऊन बदनामीचे धनी मात्र तुम्ही होताल आणि ते समाजाला नको आहे, कारण आपल्या आजूबाजूच्या ज्या मंडळीवर आरोप झाले आहेत आणि ते पुराव्यानिशी सोशल मीडियावर दाखवले जातात यावरून आता लोकांना देखील कळू लागले आहे की यामध्ये काहीतरी सत्य आहे अनेकांची मालमत्ता आंदोलनानंतर तिप्पट चौपट पाचपट वाढली गेली असा देखील आरोप केला जात आहे यावरून असे वाटते की टीका करणाऱ्यांचे चुकते काय ? मग आता अशा स्वार्थ साधणाऱ्या चौकटीचे करायचे काय? शेवटी समाज जरांगे पाटला सोबत आहे या चांडाळ चौकटी सोबत नाही त्यासाठी आत्ताच समाजाच्या हितासाठी सावध होणे गरजेचे आहे अन्यथा हाता तोंडाशी आलेला घास जाण्याची शक्यता नाकारता येत नाही जर अशा स्वार्थी मंडळीमुळे अख्ख्या समाजाचे नुकसान होत असेल तर दळणातील खड्याप्रमाणे यांना समाजाने बाजूला फेकनेच हिताचे ठरेल.

### प्रामाणिक नेत्याला स्वार्थी चौकडीचा विळखा ?

कोणत्याही मोठ्या जनआंदोलनाचा इतिहास पाहिला, तर नेता प्रामाणिक असला तरी त्याच्या आजूबाजूची सल्लागार मंडळी भ्रष्ट किंवा स्वार्थी असेल तर आंदोलनाचा अंत ठरलेला असतो. जरांगे पाटलांच्या भोवती फिरणारी ही कंत्राटदार, गुत्तेदार आणि स्वतःचे राजकीय-आर्थिक हित साधणारी मंडळी निष्कलंक राहिअलेली नाहीत, हेच वारंवार सिद्ध होत आहे. बदनामी मनोज जरांगेंची होते, रोष त्यांच्यावर ओढवला जातो, पण प्रत्यक्षात आंदोलनाच्या नावाखाली स्वतःचे खिसे भरणारे मात्र नामानिराळे राहतात. गोरगरीब मराठा बांधव विश्वासाने आंदोलनात सहभागी होतो, मात्र या चौकडीमुळे संपूर्ण समाजाच्या अस्मितेला गालबोट लागत आहे.

### आता सावध होण्याची वेळ कोणाची?

अंतिम टप्प्यात आलेले आंदोलन आणि ऐनवेळी घेतलेली माघार , त्यानंतर उठलेले आर्थिक आरोपांचे वादळ हे मनोज जरांगे पाटील यांच्यासाठी धोक्याची घंटा आहे. टीकाकारांवर केवळ आगपाखड करून किंवा विरोधकांचा डाव म्हणून हे आरोप फेटाळता येणार नाहीत. आंदोलनाला पुन्हा जनतेचा आणि समाजाचा खरा विश्वास मिळवून द्यायचा असेल, तर जरांगे पाटलांना आता अत्यंत कठोर आणि सावध भूमिका घ्यावीच लागेल. ज्यांच्यावर आरोप आहेत, ज्यांची पार्श्वभूमी वादग्रस्त आहे आणि जे या लढ्याचा वापर स्वतःच्या आर्थिक लाभासाठी करत आहेत, अशांना तातडीने आंदोलनातून बाहेरचा रस्ता दाखवावा लागेल. अन्यथा, निष्पाप समाजाच्या आशेवर उभा राहिलेला हा लढा स्वार्थी हितसंबंधांच्या ओझ्याखाली दबून संपेल, यात शंका नाही.

अग्रलेख

# सीएचे प्रमाणपत्र की गैरव्यवहाराचे कवच?

पुण्यातील परदेशी रेमिटन्सशी संबंधित प्रकरणामुळे सनदी लेखापालांच्या प्रमाणपत्रांचा वापर, बँकिंग यंत्रणेतील पडताळणी आणि आर्थिक गैरव्यवहारांवर नियंत्रण ठेवणाऱ्या यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मात्र, एखाद्या प्रकरणातील सर्व सीए किंवा संपूर्ण व्यावसायिक समुदायावर संशय घेणे योग्य ठरणार नाही. संबंधित व्यक्तींची भूमिका तपासातून आणि न्यायालयीन प्रक्रियेतूनच निश्चित होऊ शकते.

भारताबाहेर काही प्रकारचे पैसे पाठविताना करसंबंधी अनुपालनासाठी १५ आणि लागू असल्यास १५ यांसारख्या कागदपत्रांची आवश्यकता असते. काही व्यवहारांमध्ये सीएची प्रमाणपत्रे महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे प्रमाणपत्र देताना संबंधित व्यवहाराची कागदपत्रे, उत्पन्नाचे स्वरूप, कराची लागू शकणारी तरतूद आणि उपलब्ध माहिती यांची योग्य तपासणी करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते जर एखाद्या व्यवहारात खोटी कागदपत्रे, बनावट चलने किंवा संशयास्पद कंपन्यांचा वापर झाला आणि त्याची योग्य पडताळणी न करता प्रमाणपत्र अथवा व्यावसायिक प्रमाणीकरण करण्यात आले, तर त्या प्रक्रियेचा गैरवापर होण्याची शक्यता निर्माण होते. अशा प्रकरणांत संबंधित व्यावसायिकाने जाणीवपूर्वक गैरप्रकार केला होता की त्याच्याकडून निष्काळजीपणा झाला, हा तपासाचा स्वतंत्र मुद्दा असतो. काही आर्थिक गैरव्यवहारांमध्ये बनावट कंपन्या, खोटे आयात-निर्यात व्यवहार किंवा सेवांच्या नावाखाली तयार केलेली कागदपत्रे वापरली जात असल्याचे विविध तपासांत समोर आले आहे. अशा व्यवहारांना वैध स्वरूप देण्यासाठी व्यावसायिक प्रमाणपत्रांचा गैरवापर झाल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्याचा प्रश्न निर्माण होतो या समस्येचा दुसरा पैलू म्हणजे अनुपालन व्यवस्था. मोठ्या संख्येने होणाऱ्या व्यवहारांमध्ये बँका आणि सरकारी यंत्रणा प्रत्येक कागदपत्राची प्रत्यक्ष पातळीवर स्वतंत्र तपासणी करू शकत नाहीत. त्यामुळे अधिकृत प्रमाणपत्रे, घोषणापत्रे आणि उपलब्ध डिजिटल माहितीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. याठिकाणी 'विश्वासावर आधारित अनुपालन' आणि 'जोखीम आधारित पडताळणी' यांच्यातील समतोल महत्त्वाचा ठरतो. संशयास्पद व्यवहारांची रक्कम, वारंवारता, लाभार्थी, व्यवहाराचे स्वरूप आणि संबंधित पक्षांची पार्श्वभूमी यांचा एकत्रित विचार न झाल्यास काही व्यवहार तपासाच्या कक्षेबाहेर राहू शकतात. दुसरी अडचण म्हणजे तपासाची वेळ. व्यवहार झाल्यानंतर बराच कालावधी उलटल्यानंतर संशयास्पद व्यवहारांचा मागोवा घेतला गेला, तर पैसा अनेक खात्यांमधून किंवा देशांमधून फिरलेला असू शकतो. त्यामुळे आर्थिक गैरव्यवहार रोखण्यासाठी केवळ नंतरची चौकशी नव्हे, तर जोखीम ओळखून वेळेवर हस्तक्षेप करणारी व्यवस्था आवश्यक आहे अशा प्रकरणांत केवळ प्रमाणपत्र देणाऱ्या व्यावसायिकाचीच जबाबदारी आहे, असा निष्कर्ष तपास पूर्ण होण्यापूर्वी काढणे योग्य ठरणार नाही. त्याचवेळी व्यावसायिक प्रमाणपत्राचा गैरवापर झाला असल्याचे आढळल्यास संबंधित सीएची व्यावसायिक व कायदेशीर जबाबदारी निश्चित होऊ शकते. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया कडे व्यावसायिक गैरवर्तनासंदर्भात शिस्तभंगाची स्वतंत्र प्रक्रिया आहे. त्याचप्रमाणे गंभीर आर्थिक गुन्ह्यांमध्ये संबंधित तपास यंत्रणांकडून फौजदारी कारवाई होऊ शकते. कोणत्या व्यक्तीविरुद्ध कोणती कारवाई योग्य आहे, हे मात्र प्रकरणातील पुरावे आणि लागू कायद्यांवर अवलंबून अ पुण्यातील प्रकरणाचा तपास पुढे जात असताना केवळ 'कोण अडकले?' एवढाच प्रश्न महत्त्वाचा नाही. व्यवहार संशयास्पद असताना तो सुरुवातीलाच का ओळखला गेला नाही, कोणत्या स्तरावर पडताळणी झाली, कोणत्या कागदपत्रांवर विश्वास ठेवला गेला आणि संबंधित माहिती विविध यंत्रणांमध्ये वेळेवर का जोडली गेली नाही, हे प्रश्नही तपासले जाणे आवश्यक आहे. आर्थिक गैरव्यवहार रोखण्यासाठी सीए, बँका, कर प्रशासन आणि तपास यंत्रणा यांच्यातील माहिती-विनिमय अधिक प्रभावी करणे, जोखीमाधारित डिजिटल तपासणी मजबूत करणे आणि संशयास्पद व्यवहारांवर वेळेत कारवाई करणे आवश्यक आहे. कारण गैरप्रकार एखाद्या व्यक्तीच्या संगनमतामुळे घडत असतील, तर दोषींवर कारवाई झालीच पाहिजे; पण त्याचबरोबर अशा गैरप्रकारांना संधी देणाऱ्या प्रणालीतील पोकळ्याही बंद झाल्या पाहिजेत. अन्यथा एका प्रकरणानंतर दुसरे प्रकरण समोर येत राहण्याची शक्यता कायम राहील.

## आनंदग्राम च्या बप्पाची आरती एसपींच्या हस्ते!

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मा नवनवीन कावत साहेब यांच्या हस्ते करण्यात आली, या दुष्काळी भागातील बीड चा गणपती बाप्पा झाडातच आहे, या पर्यावरण पुरक गणेशाची माहीती चिमुकल्यांनी सांगीतल्यावर साहेबांना खुप समाधान वाटले, त्यांनी येथील परंपरेप्रमाणे वृक्षाला पाणी घालून देवबाप्पा ची आरती केली, मुलांशी संवाद साधला जिल्ह्यातील अनेक कठिण प्रसंगी घेतलेल्या भुमिका अनेक ठिकाणच्या आठवणी प्रश्नोत्तराच्या निमित्ताने अगदी खुल्या मनाने सांगितल्या, "छुने से बिमारी नहीं, प्यार फैलता है ।" या उक्तीप्रमाणे सर्वांना हस्तांदोलन करत करत शेवटी आनंदग्राम च्या सेवाकार्याचे कौतुक केले, व निरोप घेतला, यावेळी फकिरी आत्मचरित्र भेट दिले.



## पोलीस अधीक्षक पथकाची अंबड मध्ये कारवाई ; ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अंबड । प्रतिनिधी**

**प्रतिबंधित गुटखा विक्री केल्याप्रकरणी जालना पोलीस अधीक्षक यांच्या पथकांनी कारवाई करून जामखेड येथील तडीपार असल्याला गुटखाप्रकरणी मुख्य आरोपीवर कारवाई केली. याप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने ८ लाख ३ हजार २७८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.**

अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिवाणी व फौजदारी कारवाई करण्यात आली. या प्रकरणात मुख्य पुरवठादार व तसेच तडीपार असलेला आरोपी अनिल भाऊसाहेब भोजने (रा. जामखेड, अंबड) व अन्याय एक आरोपी यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान विविध कंपन्यांचा पानमसाला, गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ मोठ्या प्रमाणात आढळून आले. जप्त केलेल्या मालाची एकूण किंमत ८,०३,२७८ रुपये असल्याचे कागदपत्रात नमूद आहे. याशिवाय, प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात आलेली कार (क्रमांक - ४६--०४७८) तसेच कंपनीचा मोबाइल असा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पौडपणी/अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडून सुरू आहे. प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध अशाच प्रकारे कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलीस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## जालन्यातील मुलींना कमर्शियल पायलट होण्याची संधी–जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी**

**जालना जिल्ह्यातील होतकरू मुलींना विमान वाहतूक क्षेत्रात करिअर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी जालना जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या पुढाकारातून "च्या' या उपक्रमांतर्गत विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**



हा कार्यक्रम २४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयातील येथे होणार आहे. या कार्यक्रमातून पात्र युवतींना कमर्शियल पायलट म्हणून करिअर करण्याबाबत मार्गदर्शन व प्रशिक्षणाच्या संधीची माहिती दिली जाणार आहे. या योजनेसाठी १८ ते ३५ वयोगटातील भारतीय महिला उमेदवार पात्र आहेत. बारावीमध्ये इंग्रजी, भौतिकशास्त्र आणि गणित या विषयांत प्रत्येकी किमान ५१ टक्के गुण असणे आवश्यक आहे. तसेच लागू असलेले उत्पन्न निकष पूर्ण करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या पात्र उमेदवारांना आणि देण्यात येणार आहे. प्रशिक्षणाच्या कालावधीत निवास व भोजनासाठी १०० टक्के सहाय्य, वैद्यकीय विमा, पायलट मेंटॉरशिप आणि करिअर मार्गदर्शनाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. जिल्ह्यातील मुलींना पारंपरिक करिअरच्या पलीकडे जाऊन विमान वाहतूक क्षेत्रात संधी मिळावी आणि त्यांचा या क्षेत्रातील सहभाग वाढावा, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. आर्थिक किंवा सामाजिक परिस्थितीमुळे मुलींच्या स्वप्नांना मर्यादा येऊ नयेत, यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. "जालन्यातील मुलींनी विमानात केवळ प्रवासी म्हणून नव्हे, तर कॉकपिटमध्ये पायलट म्हणूनही बसावे. त्यांनी आत्मविश्वासाने आकाशाला गवसणी घालावी," अशी भावना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी व्यक्त केली आहे.

## मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी घेतला आढावा

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने संदर्भात आज पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी मंत्रालयातील बैठकीत आढावा घेऊन या योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात येणाऱ्या समस्या तातडीने सोडवून लवकरात लवकर ही योजना लाभार्थ्यांपर्यंत पोचविण्याचे निर्देश दिले.**



यावेळी पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन, पशुसंवर्धन आयुक्त किरण पाटील, सहसचिव नि.भा. मराळे, यांच्यासह पशुसंवर्धन विभागातील अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने अंमलबजावणीचा आढावा घेताना मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, योजनेसाठी अर्ज व इतर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून द्यावी. तसेच विविध शासकीय डेटाबेसमधील उपलब्ध माहितीचा प्रभावी वापर करून अर्ज, छाननी, प्राधान्यक्रम, पूर्वमंजुरी आणि अनुदान वितरणाची प्रक्रिया सुलभ करावी. डेटाबेसमध्ये माहिती उपलब्ध नसलेल्या अर्जांची स्वतंत्रपणे पडताळणी करावी. चुकीच्या नोंदींमुळे अपात्र व्यक्तीला लाभ मिळणार नाही आणि गैरव्यवहार होणार नाही, यासाठी प्रत्येक टप्प्यावरील जबाबदारी निश्चित करावी. 'प्रथम अर्ज, प्रथम प्राधान्य' पद्धत राबविताना उद्दिष्टे, उपलब्ध निधी आणि संगणकीय यंत्रणेची क्षमता विचारात घ्यावी. एकाच वेळी मोठ्या संख्येने अर्ज प्राप्त झाल्यास संकेतस्थळावर तांत्रिक अडथळे निर्माण होऊ नयेत. अर्जप्रणाली सुरू करण्यापूर्वी सर्व तांत्रिक चाचण्या पूर्ण करून त्रुटी दूर कराव्यात. राज्यातील चारा-पाण्याची उपलब्धता आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन योजनेची अंमलबजावणी करावी, असे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले. ग्रामपंचायती आणि ग्रामसभांच्या माध्यमातून योजनेची माहिती संभाव्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून व्यापक जनजागृती करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

## मंठा पो. निरीक्षकांच्या हाकलपट्टी करण्याची मागणी

### बंजारा समाजाचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

**मंठा । प्रतिनिधी**

**मंठा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाल्याचा आरोप करीत त्यांच्या कार्यकाळातील तक्रारी व अलीकडील घटनांची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत निष्पक्ष चौकशी करून तात्काळ हकालपट्टी करण्यात यावे, अशी मागणी गोर सेनेचे विजय चव्हाण यांच्यासह बंजारा समाज बांधवांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.**



दि. १९ सप्टेंबरच्या मध्यरात्री तळेगाव येथे झालेल्या घटनेत गणेशमूर्तीचे नुकसान झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, पोलिसांच्या कारवाईदरम्यान काही युवकांना मारहाण झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या घटनेची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच बंजारा समाजाच्या विविध मागण्यांसाठी झालेल्या मंठा बंदच्या पार्श्वभूमीवर काही युवकांवर गुन्हे दाखल करण्यात आल्याने समाजामध्ये नाराजी निर्माण झाल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे. सर्व समाजघटकांमध्ये समानतेची व सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली. पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांच्या कार्यपद्धतीची चौकशी करून त्यांची मंठा पोलीस ठाण्यातून बदली करावी, अन्यथा लोकशाही व सनदशीर मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी गोर सेनेचे विजय चव्हाण, बाजार समितीचे संचालक बाबाराव राठोड, चेतन राठोड यांच्यासह बंजारा समाज बांधवांची उपस्थिती होती.

पान १ वरून...

### शेतीच्या नुकसानीसंदर्भात

आहेत, अशी माहिती देखील मुख्यमंत्र्यांनी दिली. मी ही उद्या दौरा करणार आहे, सर्व मंत्री आणि आमदार बांधावर जातील. एनडीआरएफचे काही नियम आहेत, त्यानुसार प्रक्रिया सुरू राहिल. मात्र, आम्ही वाट पाहणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली असून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे अध्यक्ष तर मंत्री गिरीश महाजन, मंत्री गुलाबराव पाटील, पंकजा मुंडे, दत्तात्रय भरणे, जयकुमार गोरे, संजय राठोड, प्रताप सरनाईक, बाबासाहेब पाटील, मकरंद पाटील हे सदस्य असणार आहेत. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल हे देखील उपसमितीचे सदस्य सचिव असतील.

--------------

### हायकोर्टाचे निर्देश; सार्वजनिक ठिकाणी

तसेच सार्वजनिक ठिकाणांवर फटाके फोडण्यास/जाळण्यास बंदी घालण्याचा आदेश देऊ. तसेच फटाक्यांच्या वापरामुळे होणारे वायुप्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचे निर्देश आम्ही संबंधित सर्व प्राधिकरणांना देऊ. तसेच लाऊडस्पीकर आणि ॲम्प्लीफायरमुळे निर्माण होणाऱ्या आवाजाची पातळी मोजून मर्यादा ओलांडल्यानंतर संबंधित सामुग्री जप्त करण्यासह संबंधितांवर कायद्याप्रमाणे कारवाई करण्याच्या यापूर्वीच्या आदेशांचे आणि नियमांचे काटेकोर पालन करण्याचा आदेशही सर्व संबंधित प्रशासनांना देऊ", असेही न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्या. डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने 'सुओ मोटो' याचिकेवरील सविस्तर सुनावणीनंतर स्पष्ट केले. मुंबईसारख्या शहरांत आधीच पावसाळ्यानंतरच्या सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात हवेचे प्रदूषण वाढते. त्यात मोठ्या आवाजाचे आणि विषारी धूर पसरवणारे फटाके वाजवल्यास वायू प्रदूषणात आणि ध्वनी प्रदूषणातही भरच पडते. हे मानवी आरोग्यासाठी धोकादायक आहे. प्रकारच्या उत्सव काळांमध्ये रस्त्यांवर आणि सार्वजनिक ठिकाणांवर फटाके फोडण्यास बंदी घालणारा आदेश देण्यात येईल", असे खंडपीठाने सुनावणीअंती नमूद केले.

-----------------

### विधानपरिषदेच्या पाच जागांसाठी

ही असणार आहे. या निवडणुकीसाठी २३ ऑक्टोबर रोजी मतदान होईल आणि २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक कार्यक्रमाची घोषणा झाल्याने या पाच मतदारसंघांत निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांची धडधड वाढली आहे.पुणे पदवीधर मतदारसंघातील उमेदवारीवरून महायुतीतील घटक पक्षांमध्ये रस्सीखेच सुरू असतानाच आता पुणे शिक्षक मतदारसंघातही उमेदवारीचा पेच निर्माण होण्याची चिन्हे आहेत. निवडणूक अद्याप जाहीर झालेली नसली, तरी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष कार्यकारी अधिकारी (ओएसडी) मंगेश चिवटे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांचे ओएसडी; तसेच वाडिया महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ. सचिन सानप यांच्या भेटीगाठींमुळे राजकीय चर्चेला वेग आला आहे. विशेष म्हणजे, दोघांनीही एकाच दिवशी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांची भेट घेतल्याने या भेटींकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांसाठीची मतदारयादी प्रक्रिया पूर्ण झाली असून निवडणूक प्रक्रियेच्या दृष्टीने प्रशासकीय तयारी सुरू आहे. चिवटे यांनी सुप्रिया सुळे यांची, तर सानप यांनी शरद पवार यांची भेट घेतली. दोन्ही भेटी एकाच दिवशी झाल्याने हा योगायोग असला, तरी त्यातून शिक्षक मतदारसंघातील संभाव्य राजकीय समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे.पुणे पदवीधरभारतीय जनता पक्षाकडून लाड, तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून माने यांच्या नावाची चर्चा आहे. त्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मंत्री हसन मुश्रीफ यांनी माने यांच्या उमेदवारीला हिरवा कंदिल दर्शवला आहे. मात्र, महायुतीतील जागावाटपाचा निर्णय अद्याप झालेला नसल्याने 'लाड विरुद्ध माने'चा संभाव्य सामना कोणत्या पक्षाच्या झेंड्याखाली रंगणार, याबाबत उत्सुकता आहे.

-----------------

### दिवाळीपूर्वीच महागाईचा

झाली होती. तज्ज्ञांच्या मते, कच्च्या खाद्यतेलाच्या दरात अंदाजे ८-११% वाढ झाली आहे. त्यामुळे, कंपन्यांना या वाढीव खर्चाचा काही भाग ग्राहकांवर टाकावा लागू शकतो. त्यांनी सांगितले की दरवाढीची वेळ आणि प्रमाण हे बाजारातील मागणी आणि पुरवठ्याच्या परिस्थितीवर अवलंबून असेल.उद्योगाच्या मते, येत्या काही दिवसांत कच्च्या खाद्यतेलाची वाहतूक करणा-या जहाजांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. यामुळे बाजारातील पुरवठा आणि साठ्याची परिस्थि३ती सुधारू शकते. जर देशांतर्गत बाजारात तेलाची उपलब्धता वाढली, तर वाढलेल्या आंतरराष्ट्रीय खर्चाचा संपूर्ण भार ग्राहकांवर टाकण्याचा कंपन्यांवरील दबाव काही प्रमाणात कमी होऊ शकतो. भारत आपल्या एकूण खाद्यतेलाच्या गरजेपैकी ५८% पेक्षा जास्त तेल आयात करतो. यामुळेच आंतरराष्ट्रीय किमती आणि रुपयाच्या हालचालींचा देशांतर्गत बाजारावर थेट परिणाम होतो. भारतात दरवर्षी अंदाजे २५-२६ दशलक्ष टन खाद्यतेलाचा वापर होतो. यामध्ये पाम, सोयाबीन आणि सूर्यफूल तेलाचा मोठा वाटा आहे. ऑगस्ट २०२६ च्या ताज्या आकडेवारीनुसार, देशातील किरकोळ महागाईचा दर वाढून ४.८२% आणि खाद्य महागाईचा दर ५.९५% वर पोहोचला आहे. डाळी, साखर आणि कांदा-लसणाच्या किमती आधीच वाढल्या आहेत. दुसरीकडे, काही प्रमुख एफएमसीजी (रोजच्या वापराच्या वस्तू) कंपन्यांनी सणासुदीच्या काळात विक्री वाढवण्यासाठी किमती स्थिर ठेवण्यावर भर दिला आहे, ज्यामुळे काही अंशी ग्राहकांना तात्पुरता दिलासा मिळू शकतो.

----------------

### परतीचा पाऊसही नाही; महाराष्ट्रावर

बंगालच्या उपसागरामध्ये सध्या कमी दाबाचे तीव्र क्षेत्र म्हणजेच 'डिप्रेशन' तयार झाले असून, त्याची वाटचाल उत्तर-पश्चिम दिशेने सुरू आहे. त्यामुळे या प्रणालीचा मुख्य प्रभाव ओडिशा, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार आणि झारखंड या राज्यांवर अधिक राहणार आहे. या प्रणालीच्या प्रभावामुळे महाराष्ट्रातील पूर्व विदर्भात पुढील दोन ते तीन दिवस काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हवेतील आर्द्रता वाढल्यामुळे मेघगर्जनेसह तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडू शकतो. मात्र, ही संपूर्ण यंत्रणा महाराष्ट्रावरून जाणार नसल्याने राज्यभरात सार्वत्रिक व दमदार पावसाची शक्यता पूर्णपणे मावळली आहे.येत्या चार ते पाच दिवसांत राज्यातील काही जिल्ह्यांत पावसाचे प्रमाण थोडे वाढू शकते; परंतु हा पाऊस खरिपाच्या पिकांना जीवदान देणारा ठरणार नाही. या पावसामुळे केवळ जमिनीतील३ ओलावा टिकून राहण्यास आणि काही प्रमाणात भूजल पातळी वाढण्यास मदत होईल, मात्र धरणांमधील पाणीसाठ्यात किंवा जलस्रोतांमध्ये मोठी वाढ होण्याची चिन्हे नाहीत.दुष्काळ जाहीर करण्याच्या निकषांविषयी बोलताना सानप यांनी स्पष्ट केले की, हवामान विभागाकडील पावसाची सर्व आकडेवारी सार्वजनिक आहे. दुष्काळ जाहीर करण्यासाठी पावसाची तूट हा महत्त्वाचा निकष मानला जातो. राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये सध्या पावसाची तूट ३० टक्क्यांहून अधिक आहे, तर ज्या तालुक्यांमध्ये ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे, तेथे दुष्काळ जाहीर केला जाऊ शकतो. केवळ पावसाची तूटच नव्हे, तर 'स्टँडर्डाइज्ड प्रेसिपिटेशन इंडेक्स', वनस्पतींची स्थिती दर्शवणारे निर्देशांक, जमिनीतील ओलावा आणि भूजल पातळी अशा अनेक शास्त्रीय घटकांचा अभ्यास केला जातो. भारतीय कृषी संशोधन परिषद आणि केंद्रीय कृषी विभागाच्या निकषांनुसार राज्य सरकारची समिती अंतिम अहवाल तयार करते आणि त्यानंतरच दुष्काळ घोषित होतो.

----------------

### केंद्राकडून प्रत्येक कार्यालयाला

तरतूद करण्यात आल्याचे सांगितले.केंद्रीय भू-संसाधन विभागाचे सचिव नरेंद्र भूषण यांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावित 'केंद्रीय नोंदणी विधेयक, २०२६' संदर्भात सर्व राज्यांच्या नोंदणी महानिरीक्षकांची व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला राज्याचे नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक रविंद्र बिनवडे व उपमहानिरीक्षक राजेंद्र मुठे उपस्थित होते. या बैठकीत प्रस्तावित विधेयकातील तरतुदी, संभाव्य परिणाम आणि राज्यस्तरावरील सुधारणांबाबत सविस्तर चर्चा करून राज्यांचे अभिप्राय व सूचना जाणून घेण्यात आल्या.महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नोंदणी व मुद्रांक विभागाने महसूलवाढीसोबतच नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवा देण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण योजना यशस्वीपणे राबविले जात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिल्यावर," सर्व राज्यांनी असे नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावेत अशा सूचना करण्यात आल्या आहेत.महाराष्ट्राच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने सुरू केलेल्या 'एक जिल्हा, एक नोंदणी', 'ई-प्रमाण', पासपोर्ट कार्यालयांच्या धर्तीवर उभारलेली 'आदर्श कार्यालये' आणि 'ई-नोंदणी' यांसारख्या गतिमान उपक्रमांचे केंद्रीय सचिवांनी विशेष कौतुक केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'डिजिटल इंडिया' संकल्पनेला गती देत, नागरिकांच्या सोयीसाठी भविष्यातही अधिक लोकाभिमुख आणि तंत्रज्ञानाधिष्ठित सेवा देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने पुणे येथे सुरू झालेल्या मॉडेल कार्यालयाची दखल केंद्राने घेतली. यातूनच या कार्यालयाची उपयोगात लक्षात येते." असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं.

---------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. २३ सप्टेंबर २०२६


## थोडक्यात



### तालुकास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा फ्लाईंग बर्डस अकॅडमीचे विद्यार्थी चमकले


माजलगाव । प्रतिनिधी

सध्या माजलगाव तालुका शालेय क्रीडा स्पर्धा चालू असून काल झालेल्या तालुका क्रीडा स्पर्धेत फ्लाईंग बर्ड्स अकॅडेमी माजलगाव येथील विद्यार्थी सम्राट खामकर,याने हॅमर थ्रो स्पर्धेत तालुक्यातून प्रथम व समर्थ जाधव याने द्वितीय क्रमांक मिळवला. समर्थ जाधव याने हॅटट्रिक करत पोल वॉल्ट आणि लाँग जंप स्पर्धेत तालुक्यातून प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवला तसेच ८० मीटर्स हॅडल्स स्पर्धेत समर्थ नरवडे याने द्वितीय व २०० मीटर धावणेत प्रथम क्रमांक मिळवला या सर्व विद्यार्थ्यांची जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग चांडक मुख्याध्यापिका सारिका बजाज उपमुख्याध्यापक सचिन गायकवाड तसेच ज्योती बनसोडे,क्रीडा शिक्षक सुखदेव माने आकाश पवार व सर्व शिक्षकवृंद यांनी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### रायगडावरील दशनाम गोसावी समाजाच्या मेळाव्यास उपस्थित रहा-भास्कर गिरी

माजलगाव । प्रतिनिधी

अखंड हिंदुस्थानाचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पावन स्मृतींना अभिवादन करण्यासाठी दि. २४ सप्टेंबर रोजी किल्ले रायगडावर दशनाम गोसावी समाजाच्या वतीने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यात दशनाम गोसावी समाजाचे आद्यगुरू महंत निश्चलपुरी महाराज यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती, अशी समाजाची श्रद्धा आहे.



या ऐतिहासिक सोहळ्याच्या स्मरणार्थ रायगडावर होणाऱ्या कार्यक्रमास महाराष्ट्रातील विविध भागांतून दशनाम गोसावी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. समाजबांधवांना मार्गदर्शन करण्यासाठी दशनाम गोसावी समाज परिषदेचे राज्याध्यक्ष ओमप्रकाश गिरी, संस्थापक अध्यक्ष ड. राजेंद्र बन तसेच ह.भ.प. महंत दत्ता महाराज गिरी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला अभिवादन करण्याबरोबरच समाजाची एकजूट, सामाजिक संघटन आणि पुढील दिशा याबाबतही यावेळी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील दशनाम गोसावी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने रायगडावर उपस्थित राहून ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन मराठवाडा अध्यक्ष भास्कर गिरी यांच्या सह , प्रा. लक्ष्मण गिरी, प्रा. तात्या पुरी, दिगंबर गिरी, सुधाकर भारती, आसाराम गिरी, संजीव भारती, रवि बन, दशनाम गोसावी समाज परिषदेचे, महादेव गिरी, अमित गिरी (माजलगाव), सुरेश गोसावी पुरी चिखली,भीमाशंकर गिरी,सूर्यकांत गिरी (माजलगाव), बाजीराव गिरी सर, बालाजी पुरी (आंबेजोगाई), विश्वंभर गिरी, मच्छिंद्र बन (बीड) अशोक पुरी आळंदी, राम गिरी आळंदी, कैलास गिरी आळंदी, विष्णू गिरी पुणे, यांनी केले आहे.

# परळीच्या पाणी पुरवठ्यासाठी प्रत्यक्ष आढावा नागापूर जलशुद्धीकरण प्रकल्पाची पाहणी

परळी वैजनाथ । प्रतीनिधी

शहरातील पाणी पुरवठ्याच्या सद्यस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्री रविंद्र गित्ते, नगर परिषद पदाधिकारी, मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे व अधिकाऱ्यांनी नागापूर येथील जलशुद्धीकरण प्रकल्पाची पाहणी केली. यावेळी उपलब्ध जलसाठा, जलशुद्धीकरण प्रक्रिया आणि पाणीपुरवठा यंत्रणेची सविस्तर पाहणी करण्यात आली.



यावेळी प्रकल्पातील ब्लिचिंग व तुरटीचा उपलब्ध साठा, जलशुद्धीकरणाची सद्यस्थिती तसेच जुना प्लॅन्ट आता अकार्यक्षम झाल्याने त्याचीही पाहणी करण्यात आली. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीवरील एअर वॉल्व्हची स्थिती देखील तपासण्यात आली.तसेच प्रकल्प परिसरातील कर्मचारी निवासस्थानांचीही पाहणी करण्यात आली. निवासस्थानांची झालेली दुरवस्था पाहता आवश्यक दुरुस्ती व देखभालीबाबत यावेळी आढावा घेण्यात आला. सध्या प्रकल्पात केवळ २० टक्के पाणीसाठा असून त्यापैकी अंदाजे १५ टक्केच पाणी उपयुक्त साठा आहे. विशेष म्हणजे अद्यापही वाण नदीला समाधानकारक पाणी आलेले नाही.या अत्यंत गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करून प्रत्येक थेंबाचा योग्य वापर करण्याची गरज आहे.

दरम्यान, उपलब्ध पाणीसाठा अत्यंत मर्यादित असताना अनधिकृत पाणीउपशावर प्रभावी कारवाई होत नसल्याबद्दल पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी नाराजी व्यक्त केली. परळी शहराच्या हक्काच्या पाण्याचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस व कठोर पावले उचलावीत, अशी स्पष्ट भूमिका यावेळी मांडण्यात आली.पाण्याचे काटेकोर नियोजन आवश्यक आहे. नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा मिळावा यासाठी आवश्यक उपाययोजना सुरू आहेत. नागरिकांनीही पाण्याचा काटकसरीने वापर करून प्रत्येक थेंब जपण्यासाठी नगर परिषदेला सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले आहे. यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्री रविंद्र (पापा) गित्ते, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी, गटनेते वैजनाथ सोळंके, मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे, राजाभैय्या पांडे, माजी उपनगराध्यक्ष रविंद्र परदेशी व माजी नगरसेवक रमेश चौडे, शिवसेना युवक नेते रवींद्र गित्ते, नगर अभियंता ज्ञानेश्वर ढवळे, पाणी पुरवठा विभाग मधील संदीप समुद्रे, नागनाथ सोळंके आदी उपस्थित होते.

**आवश्यक पाणी कपातीचा निर्णय घेणे गरजेचे**

सध्या प्रकल्पात केवळ २० टक्के पाणीसाठा असून त्यापैकी अंदाजे १५ टक्केच पाणी उपयुक्त साठा आहे. विशेष म्हणजे अद्यापही वाण नदीला समाधानकारक पाणी आलेले नाही.या अत्यंत गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी लवकरच आवश्यक पाणी कपातीचा निर्णय घेणे गरजेचे असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

## ऊसतोड कामगारांच्या १९ मागण्यांसाठी संघटना आक्रमक





पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली लढा उभारण्याचा निर्धार; १०० टक्के दरवाढीसह विमा, शिक्षण व आरोग्य सुविधांची मागणी

### मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील २५ लाख ऊसतोडणी कामगार मुकादम व वाहतूकदारांचा महासंग्राम सुरु-गोरक्ष रसाळ, कृष्णा तिडके

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील ऊसतोड कामगार, मुकादम व वाहतूकदारांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलनाची भूमिका संघटनेने जाहीर केली आहे. लोकनेते मुंडे साहेब ऊसतोड कामगार, मुकादम व वाहतूकदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली नवीन दर करारासाठी साखर संघाकडे मागण्या मांडल्या आहेत. मागण्या मान्य न झाल्यास साखर कारखान्यांचे गाळप सुरू होऊ न देण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे. २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ या तीन हंगामांसाठी झालेल्या करारात ऊसतोडणी दरात ३४ टक्के वाढ झाली होती. संबंधित कराराची मुदत संपल्यानंतर आता नवीन दर कराराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**१९ कलमी मागण्यांचा समावेश**

संघटनेने ऊसतोडणी व वाहतूक मजुरीमध्ये १०० टक्के वाढ, बैलगाडी, गाडी-सेटर, मिनी ट्रॅक्टर, ट्रक व ट्रॅक्टर वाहतुकीच्या दरात वाढ तसेच मुकादमांच्या कमिशनमध्ये ५० टक्के वाढ करण्याची मागणी केली आहे. याशिवाय सर्व ऊसतोड कामगार व मुकादमांचा विमा कारखान्यांनी बंधनकारकपणे काढावा, ऊसतोड कामगारांचा कामगार कायद्यात समावेश करावा, अपघातग्रस्त किंवा मृत कामगारांच्या कुटुंबीयांना १० लाख रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. कामगारांच्या मुलांसाठी विशेष शैक्षणिक योजना व शिष्यवृत्ती, कारखाना परिसरात शाळा, दवाखाना व म्ब्युलन्सची सुविधा, कुटुंबांसाठी घर व स्वच्छतागृह तसेच कारखाना बंद राहिल्यास भरपाई देण्याची मागणीही करण्यात आली आहे. कामगारांच्या मजुरीतून चरई, बांबू व कोयते यांचे पैसे कापू नयेत, कामगार नोंदणीच्या नावाखाली पैसे उकळणाऱ्या एजन्सींवर कारवाई करावी आणि ऊसतोड महामंडळाचा निधी आरोग्य विमा व मुलांच्या शिक्षणासाठी वापरावा, अशा मागण्यांचाही निवेदनात समावेश आहे.

**'मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करणार'**

नवीन दर करारासाठी तातडीने बैठक बोलावून निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. मागण्यांवर तोडगा न निघाल्यास महाराष्ट्रासह कर्नाटकातील साखर कारखान्यांचे गाळप रोखण्याचा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. ही भूमिका संघटनेचे अध्यक्ष कृष्णा शिवदास तिडके आणि सचिव गोरक्ष दादा रसाळ यांनी मांडल्याचे वृत्त आहे. घाम आमचा... हक्कही आमचाच... आता अन्याय सहन करणार नाही, अशी भूमिका संघटनेने व्यक्त केली आहे.

## पान ६ वरुन...

### ऊसतोडणी व वाहतूक

गाळप हंगामाच्या पार्श्वभूमीवर निर्माण होणाऱ्या संभाव्य परिस्थितीचीही यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांना माहिती देण्यात आली.यावेळी लोकनेते गोपीनाथरावजी साखर कामगार संघटनेने प्रलंबित मागण्यांची पूर्तता न झाल्यास दि. १ ऑक्टोबर २०२६ पासून राज्यभरातील ऊसतोडणी व वाहतूक कामगार, मुकादम व ऊसवाहतूकदार बेमुदत संपावर जाण्याच्या तयारीत असून साखर उद्योगाची गती आणि लाखो कामगारांचे हित लक्षात घेऊन हा प्रश्न संपापूर्वीच मार्गी लावण्यासाठी शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी,अशी विनंती आ.धस यांनी फडणवीस यांना केली आहे.

यावेळी कामगारांच्या प्रश्नांबाबत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी सकारात्मक भूमिका व्यक्त करत संबंधित मागण्यांबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे ऊसतोडणी व वाहतूक कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांना शासनस्तरावर गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.कामगारांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे आ.सुरेश धस यांनी पुन्हा एकदा ऊसतोडणी कामगार, मुकादम आणि ऊसवाहतूकदारांच्या हक्काच्या मागण्यांसाठी शासनदरबारी ठाम भूमिका मांडली आहे.या प्रसंगी लोकनेते गोपीनाथरावजी साखर कामगार संघटनेचे अध्यक्ष श्री. सुखदेव मारुती सानप, माऊली आप्पा जरांगे, विकास सानप, भरत लवांडे तसेच संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### मध्यरात्री चोरीला गेलेली

रात्री ०३:४५ वाजेच्या सुमारास अंबिका चौक परिसरातून पळवून नेलेली कार हस्तगत करून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. सुधीर हनुमान वाघमारे (वय २५ वर्षे, रा. अंबिका चौक, शाहूनगर, बीड)प्रीतम गणेश हनवते (वय १९ वर्षे, रा. उमाकिरण संकुलजवळ, शाहूनगर, बीड) याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गु.र.नं. २१४/२०२६, भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०९ (४) अन्वये जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही धडक कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोलीस अंमलदार भास्कर केंद्रे, संतोष राऊत आणि सचिन आगलावे यांच्या पथकाने केली. पोलिसांच्या या जलद व धाडसी कारवाईचे नागरिकांमधून कौतुक होत आहे.

### अवैध वाळू वाहतूक करणारा

करत आहेत. तसेच गौण खनिज अधिनियमानुसार पुढील कायदेशीर कारवाईसाठी महसूल विभागाशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. सदर धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, पोलीस हवालदार कल्याण राठोड, पोलीस कॉन्स्टेबल गोरक्ष डोके, जितेंद्र ओव्हाळ व चालक पोलीस कॉन्स्टेबल राजेंद्र चोरमले यांच्या पथकाने केली.

### नवीन पीक कर्जासाठी

करण्याची मागणी करण्यात आली आहे.या प्रश्नाबाबत प्रा. वैजनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. वडवणी येथील एसबीआयच्या कथित मनमानी कारभाराला तात्काळ लगाम घालून नवीन पीक कर्जाच्या फाईली त्वरित मंजूर कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली.शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास वडवणी शहरात तालुक्यातील शेतकऱ्यांना एकत्र करून रास्ता रोको आंदोलन तसेच आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा प्रा. वैजनाथ शिंदे यांनी दिला.सदर निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री व कृषीमंत्र्यांकडेही पाठविण्यात आले आहे. यावेळी प्रा. वैजनाथ शिंदे, मोतीराम नरके, कल्पना शिंदे, विठ्ठल यादव, लालू यादव, विठ्ठल बहिरे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

### पावसाअभावी पाणीप्रश्नाची

असून, आता परतीच्या पावसावरच पाणीसाठ्याची मोठी भिस्त आहे. पाऊस झाला नाही तर पाणीप्रश्न आणखी बिकट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने आतापासूनच संभाव्य पाणीटंचाईचा विचार करून पर्यायी पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. तसेच परतीच्या पावसाचा कालावधी लक्षात घेऊन उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करण्याची गरज आहे. शेतकरी,नागरिक यांचे डोळे सध्या मांजरा धरणाच्या पाणीपातळीकडे आणि आगामी परतीच्या पावसाकडे लागले असून, धरण भरून यंदाच्या पाणीप्रश्नाला काहीसा दिलासा मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

### आष्टीत २६ सप्टेंबरला

कुंवर आणि शिक्षणाधिकारी माध्यमिक प्रियाराणी पाटील या उपस्थित राहणार आहेत.इयत्ता ७ वी शिष्यवृत्ती व छचचड परीक्षेच्या मार्गदर्शक अनिता शरद परदेशी (पुणे), इयत्ता ४ थी शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शक संजय आनंदा शिंदे (कोल्हापूर), नवोदय परीक्षा मार्गदर्शक विनोद बबनराव झनक (वाशिम) तसेच इयत्ता ४ थी शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शक प्रदीप शिवाजी धुमाळ (पुणे) मार्गदर्शन करणार आहेत. आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यातील शिक्षकांना शालेय स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने मार्गदर्शन मिळावे, विद्यार्थ्यांच्या तयारीला योग्य दिशा मिळावी आणि परीक्षांच्या माध्यमातून गुणवत्तावाढीस चालना मिळावी, हा या कार्यशाळेचा उद्देश आहे. संबंधित शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### रायगडावर २४ सप्टेंबरला दशनाम गोसावी समाजाचा भव्य मेळावा

## छत्रपतींनाअभिवादन करण्यासाठी राज्यभरातून समाजबांधवांची उपस्थिती -हरी गिरी

माजलगाव । प्रतिनिधी

अखंड हिंदुस्थानाचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पावन स्मृतींना अभिवादन करण्यासाठी दि. २४ सप्टेंबर रोजी किल्ले रायगडावर दशनाम गोसावी समाजाच्या वतीने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यात दशनाम गोसावी समाजाचे आद्यगुरू महंत निश्चलपुरी महाराज यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती, अशी समाजाची श्रद्धा आहे.



या ऐतिहासिक सोहळ्याच्या स्मरणार्थ रायगडावर होणाऱ्या कार्यक्रमास महाराष्ट्रातील विविध भागांतून दशनाम गोसावी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. समाजबांधवांना मार्गदर्शन करण्यासाठी दशनाम गोसावी समाज परिषदेचे राज्याध्यक्ष ओमप्रकाश गिरी, संस्थापक अध्यक्ष ड. राजेंद्र बन तसेच ह.भ.प. महंत दत्ता महाराज गिरी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला अभिवादन करण्याबरोबरच समाजाची एकजूट, सामाजिक संघटन आणि पुढील दिशा याबाबतही यावेळी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील दशनाम गोसावी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने रायगडावर उपस्थित राहून ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. हे आवाहन मानव विकास संस्था, शेलापुरी, ता. माजलगाव, जि. बीड संचलित नागराज बांधकाम तंत्र हस्तकला अध्यापक महाविद्यालय, तेलगाव, ता. धारूर, जि. बीडचे अध्यक्ष हरी गिरी माजलगाव, प्रा. लक्ष्मण गिरी, प्रा. तात्या पुरी, ज्ञानेश्वर उद्धवराव गिरी (पुणे), दिगंबर गिरी, सुधाकर भारती, महेश उद्धवराव गिरी (पुणे), दत्ता गिरी, आसाराम गिरी, संजीव भारती, रवि बन, दशनाम गोसावी समाज परिषदेचे युवा कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर गिरी, महादेव गिरी, अमित गिरी (माजलगाव), गणेश गिरी, भीमाशंकर गिरी, संतोष पुरी, पंकज पुरी, चांगदेव पुरी (आंबेजोगाई), सूर्यकांत गिरी (माजलगाव), बाजीराव गिरी सर, बालाजी पुरी (आंबेजोगाई), विश्वंभर गिरी, मच्छिंद्र बन (बीड) यांनी केले आहे.

## माजलगाव ते मोठीवाडी बस फेऱ्या सुरु करा, परिसरातील ग्रामस्थांची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मोठेवाडी गावाला गेल्या तीन महिन्या पासुन रस्त्याच्या कामा मुळे बस सेवा बंद होती.रस्ता



सुरूळीत झाल्या नंतरही लेखी, तोंडी सांगुनही प्रभारी आगार प्रमुख बस सुरू करण्याबाबत टाळाटाळ करीत आहेत. तालुक्यातील मोठेवाडी गावची पाच हजार लोकसख्या असुन गावाला आदर्श ग्राम पुरस्कार मिळालेला आहे. माजलगाव ते मोठीवाडी या मार्गावर सध्या बसेस उपलब्ध नसल्यामुळे प्रवासाचे प्रचंड हाल होत आहेत. सकाळच्या वेळी शाळेत व महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी, दुपारी कामानिमित्त ये-जा करणारे नागरिक, तसेच संध्याकाळी घरी परतणारे नोकव्दार व शेतकरी यांना प्रवासासाठी अत्यंत गैरसोयीचा सामना करावा लागतो. बस उपलब्ध नसल्यामुळे सर्वांना महागड्या खाजगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते.

प्रवाशांची ही अडचण लक्षात घेऊन माजलगाव आगारातून दररोज खालील वेळेत नियमित बसेस सुरू कराव्यात असी मागणी निवेदनाद्वारे मोठीवाडी ग्राम पंचायत व समस्त मोठेवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे. सकाळी ७:०० वाजता (विद्यार्थी व नोकदारांसाठी) दुपारी २:०० वाजता (सामान्य नागरिक व प्रवासासाठी) संध्याकाळी ६:०० वाजता (शाळा, कॉलेज आणि कामावरून घरी परतणायांसाठी)

या तीन वेळेत बसेस सुरू केल्यास परिसरातील सर्व नागरिकांची मोठी सोय होईल तसेच महामंडळलाही काममस्थळी चांगला प्रवासी भारमान (उत्पन्न) मिळेल.

तरी आपण या समस्येचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर सदर तिन्ही फेऱ्या सुरू कराव्यात या मागण्याचे निवेदन प्रभारी आगार प्रमुख माजलगाव यांना निवेदनाद्वारे केली आहे. अन्यथा छोटेवाडी येथे राष्ट्रीय महा मार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा सरपंच सत्यभामा दळवी,उपसरपंच अंगद खेत्री, पत्रकार राजाभाऊ पास्टे,जगन्नाथ खेत्री, कॉमरेड सुदर्शन हिवरकर,अशोक रासवे,बाबा गरड व समस्त ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला आहे.

# जीवन एकदाच मिळते; शांतता आणि सातत्य हेच जीवनाचे रहस्य : पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत

### आदित्य शिक्षण संस्थेत एकदंत गणेश मंडळाच्या श्रींची आरती उत्साहात संपन्न

बीड । प्रतिनिधी

मनुष्याला जीवन एकदाच मिळते. त्यामुळे या जीवनाचा उपयोग चांगल्या कार्यासाठी, समाजोपयोगी कामासाठी आणि स्वतःच्या ध्येयपूर्तीसाठी करावा. जीवनात कितीही अडचणी आल्या तरी मनःशांती, संयम, चिकाटी आणि सातत्याच्या बळावर आपल्या ध्येयाचा पाठपुरावा करावा असा संदेश पोलिस अधिक्षक नवनित कॉवत यांनी दिला. ते बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्थेत सर्व महाविद्यालयांच्या सहभागातून बसवण्यात आलेल्या 'एकदंत गणेश मंडळाच्या आरती प्रसंगी विद्यार्थींना मार्गदर्शन करत होते.

आदित्य शिक्षण संस्थेत सर्व महाविद्यालयांच्या सहभागातून एकदंत गणेश मंडळ उत्सव २०२६ मोठ्या उत्साहात संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, सी ए गिरीष गिल्डा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होत आहे. मंगळवार २२ सप्टेंबर रोजी सकाळी बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या हस्ते श्री ची महाआरती संपन्न झाली. यावेळी त्यांनी विद्यार्थींना मार्गदर्शन केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थी जीवन हे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे महत्त्वाचे पर्व असून, या काळात विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करून



सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. शांत मन, सकारात्मक विचार आणि सातत्यपूर्ण प्रयत्न हे यशस्वी जीवनाचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत, असेही त्यांनी सांगितले.

गणेश स्थापनेमागील एकता, सद्भावना, सकारात्मक ऊर्जा आणि सामाजिक बांधिलकी या मूळ संकल्पना अशा सामूहिक उत्सवातून प्रत्यक्षात येत असल्याचे त्यांनी सांगितले. आदित्य शिक्षण संस्थेतील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे गणेशोत्सव साजरा केल्याबद्दल त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा, सीए गिरीष गिल्डा,संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या हस्ते पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व प्राध्यापक यांच्या वतीने बहुगुणी औषधी वनस्पती असलेल्या आवळ्याचे रोप पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांना भेट देण्यात आले. जागतिक आयुर्वेद दिनाच्या निमित्ताने आयुर्वेदाच्या संवर्धनाचा आणि औषधी वनस्पतींच्या लागवडीचा संदेशही यावेळी देण्यात आला. यावेळी पेठ बीड पोलिस ठाण्याचे निरिक्षक निलेश केळे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विकास गर्जे यांनी केले. आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.श्याम भुतडा यांनी आभार मानले. यावेळी आदित्य शिक्षण संस्थेतील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एकत्रित गणेशोत्सवाचे केले कौतुक

आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेतील विविध महाविद्यालयांना एकत्रित आणून गणेशोत्सव साजरा करण्याच्या उपक्रमाचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी विशेष कौतुक केले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थी, प्राध्यापक आणि महाविद्यालयांचे प्रशासन एकत्र येऊन सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

# दुष्काळाचा निर्णय ऑक्टोबरमध्ये; सरकारकडून तीन टप्प्यांत मूल्यांकन

## केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्याच्या तिजोरीतून शेतकऱ्यांना मदत

मुंबई : राज्यातील अनेक भागांत पावसाने दीर्घ ओढ दिल्याने खरीप पिके संकटात सापडली असताना दुष्काळ तातडीने जाहीर करण्याची मागणी जोर धरत आहे. मात्र, राज्य सरकारने दुष्काळ जाहीर करण्यापूर्वी परिस्थितीचे तीन टप्प्यांत मूल्यांकन करण्याची प्रक्रिया निश्चित केली आहे. दुष्काळसदृश परिस्थितीचा प्राथमिक आढावा घेण्याबरोबरच ५ ऑक्टोबरनंतर पीक नुकसानीचे पंचनामे करण्यात येणार आहेत. त्यानंतर दुष्काळाबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी केंद्राच्या निधीची प्रतीक्षा केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. राज्याच्या निधीतून आवश्यक ती मदत देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, केंद्राकडून राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (एनडीआरएफ) अंतर्गत मदत मिळविण्यासाठी आवश्यक असलेली स्वतंत्र प्रक्रिया सुरू राहणार आहे.दुष्काळाची औपचारिक घोषणा आणि दुष्काळी परिस्थितीत तातडीच्या उपाययोजना करणे या दोन स्वतंत्र प्रक्रिया असल्याचे सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे. केंद्राच्या निकषांनुसार दुष्काळ निश्चित करण्यासाठी विविध शास्त्रीय व क्षेत्रीय निकषांची तपासणी करावी लागते. त्यामुळे केवळ पर्जन्यमानातील घट पाहून दुष्काळ जाहीर केला जात नाही. सुधारित दुष्काळ



व्यवस्थापन संहितेनुसार पर्जन्यमान, वनस्पती निर्देशांक, पेरणीचे क्षेत्र, जमिनीतील आर्द्रता आणि भूजल पातळी यांसारख्या घटकांचा विचार केला जातो. याशिवाय चाऱ्याची उपलब्धता, पिण्याच्या पाण्याची टंचाई, रोजगाराची मागणी आणि स्थलांतर यांसारख्या सामाजिक-आर्थिक बाबींचाही आढावा घेतला जातो. पर्जन्यमानाशी संबंधित अनिवार्य निकषांची तपासणी केली जाते. याशिवाय विविध सूचकांकांच्या आधारे दुष्काळाची तीव्रता निश्चित केली जाते आणि प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षण करून परिस्थितीची पडताळणी केली जाते. या प्रक्रियेनंतर संबंधित भागातील प्रत्यक्ष पीक नुकसान, पाणीटंचाई आणि अन्य परिस्थितीचा विचार करून पुढील निर्णय घेतला जाणार आहे. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दुष्काळाबाबतचा निर्णय ऑक्टोबरमध्ये घेतला जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. महसूल व वन विभागाच्या ७ ऑक्टोबर २०१७च्या शासन निर्णयानुसार दुष्काळ निश्चितीची प्रक्रिया राबविली जाते. खरीप हंगामासाठी दुष्काळ जाहीर करण्याची अंतिम मुदत ३० ऑक्टोबर असून रब्बी हंगामासाठी ३१ मार्चपर्यंत निर्णय घेता येतो.

क्षेत्रीय पाहणीत ३३ टक्क्यांपेक्षा अधिक पीक नुकसान आढळल्यास संबंधित गाव दुष्काळ जाहीर करण्यासाठी पात्र ठरू शकते. त्यामुळे आगामी पंचनामे आणि प्रत्यक्ष क्षेत्रीय पडताळणीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

दुष्काळी परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी राज्य आणि जिल्हास्तरावर यंत्रणा कार्यरत आहे. कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय दुष्काळ निरीक्षण समिती परिस्थितीचा आढावा घेणार असून, समितीच्या अंतिम अहवालानंतर दुष्काळ जाहीर करण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. दरम्यान, पावसाच्या खंडामुळे पिकांचे नुकसान झालेल्या भागात शेतकरी अडचणीत आले आहेत. त्यामुळे औपचारिक दुष्काळ घोषणेची प्रक्रिया सुरू असतानाच राज्य सरकारने मदत व टंचाई निवारणाच्या उपाययोजना सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्राच्या मदतीसाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत शेतकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागू नये, अशी सरकारची भूमिका सरकारकडून स्पष्ट करण्यात आली आहे.

# तुरीच्या अधिक उत्पादनासाठी या उपायांचा अवलंब करा

तूर हे भारतातील एक महत्त्वाचे कडधान्य पीक आहे. हे पीक सलग किंवा मुख्यत: आंतरपीक म्हणून इतर पिकात घेतले जाते. परंतु अनेकदा या पिकाच्या उत्पादनात घट येते. तूर पिकामध्ये वेळोवेळी काही गोष्टींचा अवलंब केल्यास उत्पादनात वाढ करता येते.

तूर पिकाच्या ओळींमध्ये खांडण्या : दोन झाडांतील अंतरानुसार मजुरांद्वारे खांडण्या भरणे आवश्यक आहे. काही ठिकाणी डोबणी २-३ वेळा करून खांडण्या बुजवणे आवश्यक आहे.

निंदणी : ट्रॅक्टर किंवा बैलजोडीने पेरणी केलेल्या तूर पिकाची निंदणी वेळीच करणे आवश्यक आहे. सोयाबीनसोबत आंतरपीक असल्यास सोडओळ (पट्टापेर) पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.शेंडे छाटणे : पीक २५ ते ३० दिवसांचे असताना शेंडे छाटून घ्यावेत. अलीकडे शेंडे छाटण्याची सुरक्षित अशी छोटी यंत्रे उपलब्ध आहेत. छाटणी केल्यानंतर बुरशीनाशकाची फवारणी करणे आवश्यक आहे.पाणी व्यवस्थापन : शेवरा अवस्थेपूर्वी आणि शेंगांमध्ये दाणे भरताना ओलीत करणे आवश्यक आहे. जमिनीत मुबलक ओल असल्यासच शेंडे छाटणे आवश्यक आहे.रोग आणि किडींचे नियंत्रण : शेवरा अवस्थेच्या सुरुवातीला, फुलोरा अवस्थेच्या सुरुवातीला आणि शेंगांमध्ये दाणे भरताना योग्य कीटकनाशकांचा वापर करणे आवश्यक आहे.इतर महत्त्वाच्या गोष्टी : सलग तूर लागवडीसाठी जोडओळ पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

बीटी कपाशी आणि तूर यांच्यातील आंतरपीक पद्धतीमध्ये दोन्ही पिकांची जोडओळ पद्धतीने पेरणी करणे आवश्यक आहे. योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात खते आणि सूक्ष्मसंजीवके देणे आवश्यक आहे. योग्य वेळी आणि योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून काढणी करणे आवश्यक आहे. या गोष्टींचा अवलंब केल्याने तुम्हाला तुमच्या तूर पिकाचे उत्पादन निश्चितच वाढवता येईल.



# सेंद्रिय दशपर्णी अर्क, तयार करण्याची पद्धती आणि वापर

खरीप पिकांवर सुरुवातीच्या काळात पिकांवर रसशोषक किडी आणि काही अळ्यांचा प्रादुर्भाव दिसून येतो. यावेळी सेंद्रिय कीटकनाशकाचा वापर करून या किडींचे योग्य व्यवस्थापन करता येते. यामुळे पिकांचे सुद्धा नुकसान होत नाही. सेंद्रिय शेतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अर्क तयार केले जातात. त्यापैकीच एक म्हणजे दशपर्णी अर्क होय. दशपर्णी अर्क हा अत्यंत बहुगुणी आणि बहुउपयोगी अर्क आहे. नावाप्रमाणेच या अर्कात १० वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पतीचा उपयोग केला जातो. वेगवेगळ्या उग्र वासाच्या वनस्पतीचा पाला यात वापरला जातो. दशपर्णी अर्क हे नैसर्गिक किटकनाशक असून हे शेतकऱ्यांसाठी खूप फायदेशीर आहे व शेतीचा खर्च यामुळे नक्कीच कमी होवू शकतो.

दशपर्णी अर्कासाठी वनस्पतीचा वापर : कडुनिंब पाला ५ किलो, एरंडपाला २ किलो, गुळवेलपाला २ किलो, घाणेरीपाला २ किलो, पपईचा पाला २ किलो, सिताफळाचा पाला २ किलो, रूईचा पाला २ किलो, पांढरा धोतरा २ किलो, करंजपाला २ किलो, लाल कन्हेरपाला २ किलो, झेंडू पाने, निरगुडी, बेशरम, पेरू इत्यादी २ किलो.

इतर साहित्य : प्लास्टीक टाकी २०० लिटर, देशी गायीचे शेण ३ किलो, देशी गायीचे गोमूत्र ५ लिटर, हिरवी मिरची ठेचा २ किलो, लसुण ठेचा पाव किलो, वरीलपैकी कोणत्याही १० वनस्पतीचा पाला घ्यावा. एखाद दुसरी वनस्पती उपलब्ध नसल्यास इतर कोणत्याही उग्र वनस्पतीचा पाला चालू शकतो. शक्यतो देशी गायीचे शेण ताजे घ्यावे, सुकलेले वापरू नये. गोमूत्र



जितके जुने तेवढा त्याचा औषधी गुणधर्म जास्त असतो.

दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत : यापैकी करंज, रूई, सिताफळाचा पाला, कडुनिंबाचा पाला, महत्त्वाचा बाकीचे सर्व उपलब्ध असतील त्यानुसार घेणे सर्व मिळून १० वनस्पती होणे गरजेचे आहे. वरील सर्व वनस्पती बारीक करून घेणे तसेच तिखट हिरवी मिरचीचा ठेचा, लसूण ठेचा, देशी गायीचे शेण व गोमूत्र हे सर्व मिश्रण २०० लिटर क्षमता असलेल्या पाण्याच्या ड्रममध्ये सडविण्यासाठी सावलीत ठेवून ते गोणपाटाने झाकून ठेवावे. दिवसातून कमीत कमी २ वेळा हे मिश्रण काठीने ढवळावे व पुन्हा गोणपाटाने झाकून ठेवून असे मिश्रण १ महिनाभर ठेवल्यानंतर त्याला उग्र वास येतो त्यानंतर हे मिश्रण सुती कापडाने गाळून घ्यावे. दशपर्णी अर्क तयार करताना तो सावलीच्या जागी करावा. दशपर्णी अर्क तयार झाल्यानंतर वस्त्रगाळ करण्यासाठी सुती कापडाचा वापर करावा.

दशपर्णी अर्काचा वापर : दशपर्णी अर्क तयार केल्यापासून ३ महिन्याच्या आत वापरता येते. मात्र अर्क बंद झाकणाच्या कॅनमध्ये व्यवस्थित ठेवलेला असावा. दशपर्णी हा तयार झालेला अर्क कीड नियंत्रणासाठी १६ लिटर पाण्यात २०० मिली दशपर्णी अर्क फवारणीसाठी वापर करावा. फवारणी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळी करावी.

दशपर्णी अर्काचे फायदे : दशपर्णी अर्काच्या फवारणीमुळे मित्र किडीचे संवर्धन होऊन नैसर्गिक पद्धतीने कीड नियंत्रण होते. उग्र वासामुळे किडी पिकांमध्ये अंडी देण्यापासून परावृत्त होतात. रासायनिक किटकनाशकाचा वापर कमी झाल्याने पिकांवर किडनाशकांचे अंश राहत नाहीत. अर्क फवारणीमुळे लहान अळ्या, रसशोषक किडी व किडींची अंडी अवस्थेचे निर्मूलन होते. पर्यावरणपूरक कीड नियंत्रण झाल्याने सकस व विषमुक्त भाजीपाला उत्पादित होतो व शेती मालास सेंद्रिय म्हणून उत्तम दरही मिळतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४९९ : बेसलचा तह स्वित्झर्लंड स्वतंत्र राष्ट्र बनले.
१६६० : शिवाजी महाराजांच्या आज्ञेवरुन पन्हाळगड सिद्दी जौहरच्या ताब्यात देण्यात आला.
१८८८ : 'द नॅशनल जिऑग्रॉफिक' या मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९३१ : नेपाळ-राजपुत्र हेमसमशेर जंगबहादुर राणा यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांची भेट घेतली.
१९६५ : दुसरे काश्मीर युद्ध संयुक्त राष्ट्रसंघाच्या युद्धबंदी आदेशानंतर भारत पाकिस्तान मधील दुसरे काश्मीर युद्ध थांबले.
१९८० : इराकने इराण पादाक्रांत केले.
१९८२ : कलावैभव निर्मित, जयवंत दळवी लिखित व रघुवीर तळाशिलकर दिग्दर्शित 'पुरुष' या नाटकाचा पहिला प्रयोग दादर येथील शिवाजी मंदिर येथे झाला.
१९९५ : श्रीलंकेच्या हवाई दलाने नागरकोवेल येथे एका शाळेवर केलेल्या बॉम्बहल्ल्यात कमीतकमी ३४ जण ठार झाले. यातील बहुसंख्य तामिळ विद्यार्थी होते.
१९९५ : घरात अथवा कार्यालयात राष्ट्रध्वज फडकाविण्याचा अधिकार सर्वसामान्य नागरिकास असल्याचा दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय
१९९८ : क्रिकेटपटू सुनील गावसकर यांना 'महाराष्ट्र भूषण' हा महाराष्ट्र राज्याचा सर्वोच्च सन्मान जाहीर
२००३ : नासाच्या गॅलिलिओ या अंतराळ यानाने गुरूच्या वातावरणात प्रवेश करीत प्राणार्पण केले.


### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९१ : मायकेल फॅरेडे इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: २५ ऑगस्ट १८६७)
१८२९ : व्हिएतनामचा राजा टू डुक यांचा जन्म.
१८६९ : व्ही. एस. श्रीनिवासशास्त्री कायदेतज्ञ, सूक्ष्मबुद्धीचे राजकारणी, भारत सेवक समाजाचे अध्यक्ष आणि इंग्रजी वक्ते (मृत्यू: १७ एप्रिल १९४६)
१८७६ : फ्रांसचे पंतप्रधान आंद्रे तार्द्यू यांचा जन्म.
१८७८ : जपानचे पंतप्रधान योशिदा शिगेरू यांचा जन्म.
१८८५ : ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान बेन चीफली यांचा जन्म.
१८८७ : कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षणतज्ञ, बहुजनसमाजातील तळमळीचे कार्यकर्ते, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, पद्मभूषण (मृत्यू: ९ मे १९५९)
१९०९ : दत्तात्रय तुकाराम तथा 'दत्तू' बांदेकर ऊर्फ 'सख्याहरी' विनोदी लेखक, विडंबनकार व स्तंभलेखक (मृत्यू: ३ आक्टोबर १९५९)
१९१५ : अनंत माने पाच तपांहुन अधिक काळ चित्रपटसृष्टीसाठी व्यतीत करणारे व मराठी चित्रपटसृष्टीवर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे दिग्दर्शक. 'पिंजरा', 'लक्ष्मी', 'सुशीला', 'आई' हे त्यांचे गाजलेले चित्रपट आहेत. 'अनंत आठवणी' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. (मृत्यू: ९ मे १९९५)
१९२२ : नोबेल पारितोषिक विजेते चिनी भौतिकशास्त्रज्ञ चेन निंग यांग यांचा जन्म.
१९२३ : ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व उद्योगपती रामकृष्ण बजाज यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५३९ : गुरू नानक देव शिख धर्माचे संस्थापक आणि पहिले गुरू (जन्म: १५ एप्रिल १४६९)
१९५२ : फिनलंड देशाचे पहिले अध्यक्ष कार्लो जुहो स्टॅहल्बर्ग यांचे निधन. (जन्म: २८ जानेवारी १८६५) रसायनशास्त्रज (जन्म: २ सप्टेंबर १८७७)
१९५६ : नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश रसायनशास्त्रज फ्रेडरिक सॉडी यांचे निधन. (जन्म: २ सप्टेंबर १८७७)
१९७० : शरदेंन्दू बंदोपाध्याय बंगाली लेखक (जन्म: ३० मार्च १८९९)
१९९१ : दुर्गा खोटे हिन्दी व मराठी चित्रपटातील अभिनेत्री. सुमारे ५० वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी ३०० हून अधिक चित्रपटांत भूमिका केला. १९८२ मध्ये 'मी दुर्गा खोटे' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. (जन्म: १४ जानेवारी १९०५)
१९९४ : जी. एन. जोशी भावगीतगायक व संगीतकार. एच. एम. व्ही. या कंपनीत काम करत असताना त्यांनी अनेक नवीन गायकांना संधी देऊन त्यांच्या ध्वनिमुद्रिका काढल्या. (जन्म: ६ एप्रिल १९०९)
२०११ : मन्सूर अली खान पतौडी भारतीय क्रिकेट कप्तान आणि पतौडी संस्थानचे ९ वे व शेवटचे नबाब (जन्म: ५ जानेवारी १९४१)

# टोमॅटोवरील विषाणूजन्य रोगांचे नियंत्रण



गेल्या ४ ते ५ वर्षांपासून टोमॅटो उत्पादक पट्ट्यांमध्ये विविध विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढताना दिसून येत आहे. विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाल्यावर टोमॅटो लवकर पिकणे, रंगाने पिवळे होणे, फळांमध्ये विकृती अशी विविध लक्षणे दिसून येतात. अशा फळांना दर न मिळाल्याने आर्थिक नुकसान होते. या विषाणूजन्य रोगांचा प्रसार प्रामुख्याने मावा, तुडतुडे, पांढरी माशी, फुलकिडे इ. रसशोषक किडींमुळे होतो. रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विषाणूच्या वाहक रसशोषक किडींचे वेळीच नियंत्रण करणे गरजेचे आहे.

टोमॅटो मोझॅक व्हायरस (सीएमव्ही) :हा विषाणूजन्य रोग टोबॅको मोझॅक व्हायरस, कुकुंबर मोझॅक व्हायरस, पोटॅटो मोझॅक व्हायरस यांच्यामुळे होतो. सुमारे १२०० पेक्षा जास्त वनस्पतींवर रोगाचा प्रादुर्भाव आढळून येतो. हा रोग मुखत्वे रोपवाटिका व पिकाच्या वाढीच्या अवस्थेत येतो. पाने फिक्कट पिवळसर, बुटाच्या लेसप्रमाणे लांबलेली, वाकडी दिसणे अशी लक्षणे दिसत आहेत. पानांना हिरवट पिवळसर डाग, वाढ खुंटणे, रंगहीन, उशिरा पक्क होणारी, लहान आकाराची फळे आढळून येतात. या रोगाचा प्रसार मावा किडीमार्फत होतो.

पोषक वातावरण : तापमान २५ ते ३० अंश सेल्सिअस, आर्द्रतायुक्त, ढगाळ व दमट हवामानात रोगाचा प्रादुर्भाव जास्त वेगाने होते. त्यामुळे रोगाचा प्रसार वाढतो.

टोमॅटो क्लोरोसिस व्हायरस : या विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव पिकाच्या कोणत्याही अवस्थेत होऊ शकतो. रोपवाटिकेतून आलेल्या रोपांत विषाणूचा प्रादुर्भाव असेल तर प्रादुर्भाव लवकर होतो. सुरुवातीला पानांवर अनियमित विविध रंगांचे, आकाराचे ठिपके पडतात. पानांच्या शिरा हिरवट राहून, इतर पानांचा भाग हिरवट पिवळसर होतो. पिवळसरपणा हळूहळू तीव्र होतो. मॅग्नेशिअमची कमतरता असल्यासारखी लक्षणे दिसतात. त्यामुळे रोगाची ओळख पटविणे कठीण होते.

रोगाची लक्षणे : वाढीच्या सुरुवातीच्या काळात बुरशीपासून होणाऱ्या लवकर व उशिरा येणाऱ्या करपा रोगासारखी दिसतात. त्यामुळे रोगाची योग्य ओळख पटविण्यात अडचणी येतात. प्रादुर्भावाची सुरुवात शेंड्याकडून होते. शेंड्याकडून नवीन पानांवर लहान तांबूस काळसर ठिपके, चट्टे, तपकिरी वर्तुळे दिसून येतात. पुढे तीन ते चार दिवसांत कोवळी पाने करपून काळी पडतात. पाने, देठ, कोवळ्या फांद्या आणि खोडापर्यंत पसरत जाऊन तपकिरी काळपट चट्टे पडतात. प्रादुर्भाव लागवडीपासून महिन्यात झाल्यास फळधारणा न होता झाड १० ते १५ दिवसांत करपून मरते. उशिरा प्रादुर्भाव झाल्यास फळांचे तोडे कमी होतात.

लीफकर्ल (पर्णगुच्छ किंवा बोकड्या) : रोगाचा प्रसार पांढऱ्या माशी मार्फत होतो. रोगाचा प्रादुर्भाव उन्हाळ्यातील किंवा पावसाळ्यानंतरच्या पिकावरील येणारा महत्त्वाचा विषाणू रोग आहे. रोप अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास रोपांची वाढ खुंटते. रोपाची पाने खालच्या दिशेने गुंडाळी होऊन सुरकुतलेली दिसतात. त्यामुळे नवीन तयार होणाऱ्या पानांवर पांढरे चट्टे दिसून येतात. गुंडाळी झालेली पाने खरबरीत आणि ठिसूळ बनतात. शाकीय वाढ कमी होते. त्यामुळे रोपांची वाढ खुंटते. प्रादुर्भावित रोपे मलूल दिसतात. रोपे झुडपांसारखी वाढ झालेले दिसतात. रोपे संपूर्णतः वांझोटी बनतात. पाने जाड होऊन खरबरीतपणा येतो. पानाची खालची बाजू जांभळी बनते. फळे आकाराने लहान राहतात.संरक्षण करण्यासाठी उपाययोजना : लागवडीसाठी खात्रीशीर आणि दर्जेदार, रोगास प्रतिरोधक, सहनशील वाणांचा वापर करावा. बंगळूर येथील राष्ट्रीय फळबाग संशोधन संस्थेने अर्का रक्षक, अर्का सम्राट, अर्का अभेद्या या जातींची शिफारस आहे. परवानाधारक रोपवाटिकेतूनच रोपांची खरेदी करावी. रोपवाटिकेमध्ये इन्सेक्ट नेट-हाऊस, पॉलिहाउस, शेडनेट हाउस अशा सुविधा असाव्यात. रोपवाटिकेमध्ये रसशोषक किडी (मावा, फुलकिडे, पांढरी माशी इ.) याचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. रोपे ४० ते ६० मेश नायलॉनच्या जाळीच्या मंडपामध्ये तयार केल्यास रसशोषक किडींचा प्रादुर्भाव कमी करता येतो. साधारण २० दिवसांपेक्षा कमी वयाचे किंवा २८ दिवसांपेक्षा जास्त वयाची रोपे लागवडीसाठी वापरू नयेत. रोपांचे पुरेसे हार्डनिंग झालेले असावे.

जैविक नियंत्रण :निंबोळी अर्क (५ टक्के) किंवा अझाडिरेक्टिन (१५०० पीपीएम) ३० मिलि किंवा व्हर्टिसिलियम लेकॅनी किंवा मेटारायझीम ॲनिसोप्ली ४० ग्रॅम

रासायनिक नियंत्रण : डायमेथोएट (३० टक्के) २० ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रीड (१७.८० टक्के) ५ ग्रॅम किंवा थायामेथोक्झाम (२५ टक्के) ३ ते ४ ग्रॅम किंवा याप्रमाणे दर १० दिवसांच्या अंतराने आलटून पालटून फवारणी करावी. (लेबल क्लेम आहेत.)



बुधवार दि.२३ सप्टेंबर २०२६ | ५

राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत



# ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतला जालना जिल्ह्यातील पाणीटंचाई व चारा उपलब्धतेचा दूरदृष्यप्रणालीद्वारे आढावा

**पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी व चारा नियोजनाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे दिले निर्देश | जिल्ह्यातील सर्व जलस्रोतांचे ऑडिट करावे ; चारा उपलब्धतेसाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करा**

मुंबई/जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील सर्व जलस्रोतांची सद्यस्थिती, उपलब्ध पाणीसाठा आणि संभाव्य वापराचे तातडीने लेखापरीक्षण करून पुढील ऑगस्टपर्यंतचा पाणीपुरवठा आराखडा तयार करावा. नागरिकांसह पशुधनासाठी पाणी आणि चाऱ्याची उपलब्धता यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी दिले.पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज दूरदृष्यप्रणालीद्वारे जालना जिल्ह्यातील पाणीटंचाई आणि चारा उपलब्धतेचा आढावा घेतला. यावेळी जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.जालना जिल्ह्यातील धरणे, तलाव, विहिरी, लघुपाटबंधारे आणि अन्य नैसर्गिक जलस्रोतांतील पाणीसाठ्याचे लेखापरीक्षण पुढील बैठकीपूर्वी पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.



जायकवाडी प्रकल्पातून होणाऱ्या पाणीपुरवठ्याची स्थिती आणि अंबड व जालना शहरांना उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा कालावधी यांचा अचूक अंदाज घ्यावा. पुढील पावसाळ्यापर्यंत पाणी उपलब्ध न झाल्यास निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा विचार करून पर्यायी नियोजन करावे, असे पालकमंत्री मुंडे यांनी स्पष्ट केले.महानगरपालिका, नगरपंचायती, मोठ्या ग्रामपंचायती तसेच दुर्गम व डोंगराळ गावांसाठी पिण्याच्या पाण्याचे स्रोत आतापासून निश्चित करावेत. या स्रोतांतील पाणीसाठ्याचे नियमित निरीक्षण करून आवश्यकतेनुसार पर्यायी स्रोत तयार ठेवावेत. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी शेती, उद्योग, मोठी बांधकामे आणि अन्य पाणीखाऊ वापरांचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजनांचा प्रस्ताव तयार करावा.टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा पारदर्शक आणि परिणामकारक ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा. प्रत्येक टँकरला जीपीएस प्रणाली जोडून पाणी प्रत्यक्ष गरजू नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याची खात्री करावी, असे पालकमंत्री मुंडे यांनी सांगितले.

जालना जिल्ह्यातील पशुधनाची संख्या, उपलब्ध चारा आणि संभाव्य तूट यांचा समावेश असलेला स्वतंत्र चारा कृती आराखडा तयार करावा. चारा डेपो अथवा चारा छावण्यांची आवश्यकता, जिल्ह्याची चारा स्वयंपूर्णता आणि अतिरिक्त चारा मिळविण्याचे स्रोत निश्चित करावेत. शेजारील जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधून तेथील चारा उपलब्धतेचा अभ्यास करावा, असेही त्यांनी निर्देशित केले.पाणी उपलब्ध असलेल्या भागांतील शेतकऱ्यांना चारा पिकांच्या लागवडीसाठी प्रोत्साहित करावे. गाळपेरा क्षेत्रांचा चारा उत्पादनासाठी उपयोग करण्याची व्यवहार्यता तपासून त्याबाबतचा निर्णय प्रस्ताव तयार करावा. चारा छावण्या अथवा अन्य उपायांसाठी राज्यस्तरीय निर्णय आणि निधीची आवश्यकता असल्यास शासनाकडे तातडीने प्रस्ताव सादर करावा, असे पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले.

पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी आणि चारा या विषयांवर केंद्रित स्वतंत्र बैठक २८ ऑक्टोबर रोजी घेण्यात येणार आहे. या बैठकीसाठी जलस्रोतांचे लेखापरीक्षण, चारा नियोजन, संभाव्य पाणीटंचाईची गावे आणि आवश्यक उपाययोजनांची सविस्तर माहिती तयार ठेवण्याचे निर्देश पालकमंत्री मुंडे यांनी दिले.जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, सर्व जलस्रोतांचे लेखापरीक्षण करून संभाव्य पाणीटंचाईची ठिकाणे निश्चित करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात येईल. तसेच पिण्याचे पाणी व चारा उपलब्धतेवर विशेष लक्ष केंद्रित करून शेजारील जिल्ह्यांशी समन्वय साधण्यात येईल. जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक पूर्वनियोजन करून उपाययोजना कराव्यात. जिल्ह्यातील सर्व पाण्याचे स्त्रोत शोधून त्यांची उपलब्धता व सद्यःस्थितीची माहिती संकलित करून ठेवावी. तसेच, पिक कापणी प्रयोगाच्या आधारेच शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळत असल्याने सर्व संबंधित यंत्रणांनी पिक कापणी प्रयोग गांभीर्याने व अचूकपणे पूर्ण करावेत. तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी टंचाईसंदर्भात बैठक घेऊन आवश्यक त्या उपाययोजनांचे पूर्वनियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

# पांढरी जि. प. शाळेला लोकसहभागातून ४२ हजारांचा निधी सुपूर्द



मादळमोही । प्रतिनिधी

स्थानिक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पांढरी येथे शालेय व्यवस्थापन समितीची () निवड प्रक्रिया अत्यंत उत्साही व खेळीमेळीच्या वातावरणात बिनविरोध पार पडली. यामध्ये अध्यक्षपदी श्री. कृष्णा काकासाहेब जायगुडे यांची, तर उपाध्यक्षपदी श्री. भरत शिवाजी कांबळे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.निवड प्रक्रिया पार पडताच नवनिर्वाचित शालेय व्यवस्थापन समितीने सामाजिक बांधिलकी जपत शाळेच्या भौतिक व शैक्षणिक विकासासाठी ₹४२,०००/– (बेचाळीस हजार रुपये) इतकी रक्कम लोकसहभागातून तत्काळ जमा करून शाळेकडे सुपूर्द केली. समितीच्या या तत्पर व स्तुत्य योगदानाचे ग्रामस्थ व पालकांकडून विशेष कौतुक होत आहे.

नवनिर्वाचित शालेय व्यवस्थापन समिती पुढीलप्रमाणे: अध्यक्ष: श्री. कृष्णा काकासाहेब जायगुडे उपाध्यक्ष: श्री. भरत शिवाजी कांबळे सदस्य: श्री. सिद्धांत भागवत लांबूड, श्रीमती शितल दत्तात्रय जगताप, श्रीमती अंजली जालिंदर राऊत, श्री. अशोक कैलास कांबळे, श्रीमती मीना एकनाथ कांबळे, श्रीमती सुमन गोपिनाथ कारके, श्रीमती प्रियंका अंकुश परदेशी ग्रामपंचायत प्रतिनिधी: श्री. भाऊसाहेब रामराव इंगळे शिक्षक प्रतिनिधी: श्री. आशिष मदन फुलझळके शिक्षणप्रेमी: श्री. सचिन रामेश्वर आखेर सदस्य सचिव: मुख्याध्यापक श्री. विष्णू निला आडेकार्यक्रमप्रसंगोपात्त शाळेच्या वतीने माजी शालेय व्यवस्थापन समितीच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. तसेच नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. नवीन समितीच्या पाठबळामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेला व भौतिक सुविधांना नवी दिशा मिळेल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री. विष्णू आडे यांनी केले. सूत्रसंचालन श्री. आशिष फुलझळके यांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्री. शहादेव काळे यांनी मानले. या कार्यक्रमास ग्रामस्थ, पालक व शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हेल्मेट सक्तीला लातूर जिल्ह्यातून दिवसेंदिवस वाढता प्रतिसाद

## गणेश मंडळांचाही उत्स्फूर्त सहभाग; रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून हेल्मेट वाटप

लातूर । प्रतिनिधी

जिल्ह्यात वाढत असलेल्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने १ सप्टेंबर २०२६ पासून संपूर्ण जिल्ह्यात हेल्मेट सक्तीची अंमलबजावणी करण्यात आली आहे. दुचाकी चालविताना प्रत्येक नागरिकाने हेल्मेटचा वापर करावा, यासाठी कारवाईसोबतच व्यापक जनजागृतीवरही पोलिसांकडून भर दिला जात आहे. जिल्ह्यातील १०० टक्के दुचाकीस्वार हेल्मेटचा वापर करू लागेपर्यंत हेल्मेट सक्तीबाबतची कारवाई आणि जनजागृती सुरूच राहणार असल्याची भूमिका लातूर पोलिसांनी घेतली आहे.लातूर पोलिसांच्या या आवाहनाला जिल्ह्यातील नागरिकांकडून दिवसेंदिवस सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, आता या मोहिमेत गणेश मंडळांचाही सक्रिय सहभाग वाढला आहे. यंदा अनेक गणेश मंडळांनी पारंपरिक उत्सवाला सामाजिक उपक्रमांची जोड देत रक्तदान शिबिरांचे आयोजन केले असून, रक्तदात्यांना हेल्मेट भेट देऊन सुरक्षित प्रवासाचा संदेश दिला आहे.

किनगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोपरा येथे गणेश मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात सहभागी झालेल्या ७८ रक्तदात्यांना हेल्मेटचे वाटप करण्यात आले. रक्तदानासारख्या सामाजिक उपक्रमासोबतच रस्ते सुरक्षेचा संदेश देत मंडळाने हेल्मेट वापराबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.लातूर शहरातील ओंकार गणेश मंडळाच्या वतीनेही रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात सहभागी झालेल्या ६२ नागरिकांना हेल्मेटचे वाटप करण्यात आले. रक्तदान आणि हेल्मेट वाटपाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासत मंडळाने लातूर पोलिसांच्या हेल्मेट जनजागृती मोहिमेला हातभार लावला.उदगीर शहर पोलीस ठाणे परिसरातही हेल्मेट जनजागृती उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या हस्ते ५०० हेल्मेट, तर उपविभागीय पोलीस अधिकारी भातलवंडे यांच्या हस्ते १०० हेल्मेटचे वाटप करण्यात आले.गणेश विसर्जनाला अद्याप काही दिवस शिल्लक असून, जिल्ह्यातील आणखी अनेक गणेश मंडळांनी रक्तदानासारखे सामाजिक उपक्रम आयोजित करून त्यामध्ये सहभागी होणाऱ्या नागरिकांना हेल्मेट वाटप करण्याचे नियोजन केले असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत 'रक्तदानासोबत रस्ते सुरक्षेचा संदेश' देण्याचा प्रयत्न यंदा लातूर जिल्ह्यातील अनेक गणेश मंडळांनी केला आहे. हेल्मेट हे केवळ पोलिसांच्या कारवाईपासून वाचण्यासाठी नव्हे, तर अपघाताच्या वेळी जीवितहानी टाळण्यासाठी अत्यावश्यक सुरक्षा साधन आहे, हा संदेश या उपक्रमातून नागरिकांपर्यंत पोहोचत आहे.हेल्मेट सक्तीच्या उपक्रमाला सामाजिक चळवळीचे स्वरूप देत रक्तदान शिबिरे आयोजित करून हेल्मेट वाटप करणाऱ्या सर्व गणेश मंडळांचे लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने कौतुक करण्यात येत आहे. तसेच उर्वरित गणेश मंडळांनीही गणेशोत्सवातील उर्वरित दिवसांमध्ये अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून हेल्मेट वापराबाबत जनजागृती करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन लातूर पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.हेल्मेट वापराची सवय ही प्रत्येक दुचाकीस्वाराच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असून, 'हेल्मेट हे ओझे नसून कुटुंबाचे सुरक्षा कवच आहे', हा संदेश या उपक्रमातून अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचत आहे.

# उदगीर तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करून शेतकऱ्यांना मदत द्या; काँग्रेसची प्रशासनाकडे मागणी

उदगीर। प्रतिनिधी

तालुक्यात यंदा पावसाने मोठा खंड दिल्याने अनेक गावांतील पिकांची वाढ खुंटली असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर उदगीर तालुक्यात तातडीने दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय मदत व प्रलंबित पीक विम्याची रक्कम मिळावी, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. काँग्रेसचे शिष्टमंडळाने हे निवेदन सादर केले. पावसातील खंडामुळे पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असून, मागील काळातील नुकसानाची पीक विमा भरपाईदेखील अनेक शेतकऱ्यांना अद्याप मिळालेली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून भरपाई द्यावी, प्रलंबित पीक विमा पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा, पर्जन्यमापक यंत्रणा सक्षम करावी, तसेच शेतकऱ्यांना कर्ज, वीज, पाणी आणि जनावरांसाठी चारा व पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशा विविध मागण्या करण्यात आल्या. तसेच परिस्थितीचा वस्तुनिष्ठ अहवाल शासनाकडे पाठवून विशेष मदत मिळवून देण्याची मागणीही करण्यात आली. यावेळी काँग्रेस पक्षाचे विधानसभा प्रभारी व निरीक्षक डॉ. श्रावण रॅपनवाड, महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश सचिव कल्याण पाटील, महाराष्ट्र प्रदेश सचिव (अनुसूचित जाती विभाग) मधुकर एकुर्गेकर, प्रदेश सरचिटणीस विजयकुमार चवळे, जिल्हा परिषद सदस्य प्रशांत गायकवाड, मुकेश भालेराव, माजी सभापती मुन्ना पाटील, जिल्हा सचिव ज्ञानोबा गोडभरले, जिल्हा संघटक रामेश्वर बिरादार, जिल्हा सचिव संदीप पाटील, उदगीर शहराध्यक्ष मंजुरखा पठाण, नाना ढगे, लक्ष्मण बतले, विवेक जाधव, आदर्श पिंपरे, दत्ता सुरणर, अभिजीत माने, गणेश कारभारी, ओमभैय्या गांजुरे, हसन चाऊस, राजेश्वर भाटे, बबन धनबा, अमोल पाटील, मंगेश कुमार हेलकर, प्रकाश कांबळे, मुळे बालिका मॅडम, लक्ष्मणराव सोनवळे, बसवराज पाटील मलकापूरकर, सतीश पाटील मानकीकर, विराज भैय्या पाटील, कुरेशी मौज, शेख मोहिद, शेख फकरान, अजमत पठाण, शेख अब्बास नवाज, ज्ञानेश्वर भांगे, मुनाफ शेख यांच्यासह काँग्रेसचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी लाच

## महावितरणच्या कनिष्ठ पकडलाअभियंत्याला एसीबीची कारवाई

जालना। प्रतिनिधी

ट्रान्सफॉर्मर बसविण्याच्या कामासाठी परवानगी देण्याच्या मोबदल्यात ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना महावितरणच्या कनिष्ठ अभियंत्याला जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले.लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने नूर मोहम्मद अलीमुद्दीन सिद्दीकी (वय ४० वर्षे), कनिष्ठ अभियंता, ग्रामीण शाखा क्रमांक २, एमएसईबी कार्यालय, बदनापूर, जि. जालना, असे कारवाई करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे.

तक्रारदार हे विद्युत कंत्राटदार असून त्यांना नगरपंचायत बदनापूर येथे ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम मिळाले होते. या कामासाठी विद्युत पुरवठा खंडित करण्याची परवानगी आवश्यक असल्याने त्यांनी संबंधित कनिष्ठ अभियंत्याशी संपर्क साधला. मात्र, परवानगी देण्यासाठी आरोपीने ५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याची तक्रार एसीबीकडे करण्यात आली.तक्रारीची पडताळणी केल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २१ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी बदनापूर बसस्थानक परिसरात सापळा रचला. यावेळी तक्रारदाराकडून ५ हजार रुपये लाच स्वीकारताना आरोपी कनिष्ठ अभियंत्याला एसीबीच्या पथकाने ताब्यात घेतले.या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. कारवाई पोलीस उपअधीक्षक वाय. एस. जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. या सापळा कारवाई मध्ये पो.ह गजानन घायवट.पो.अ गणेश चेके, चालक नाईक कापसे हे होते.

# जालन्यात राशनच्या तांदळावर छापा

जालना। प्रतिनिधी

जालना शहरातील औरंगाबाद चौफुली परिसरात लेकवूड हॉटेलच्या पाठीमागील पत्र्याच्या शेडवर छापा टाकून सुमारे २० क्विंटल तांदूळ जप्त करण्यात आला. सदरील तांदूळ स्वस्त धान्य दुकानाचा असल्याचे समजते. जप्त करण्यात आलेल्या तांदळाची अंदाजे किंमत ८० हजार रुपये आहे. सदर धान्य काळ्या बाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने साठवून ठेवल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे २० सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता सदर ठिकाणी छापा टाकण्यात आला. यावेळी पत्र्याच्या शेडमध्ये ५० किलो वजनाचे एकूण ४५ तांदळाचे कट्टे आढळून आले. या तांदळाचे एकूण वजन अंदाजे २० क्विंटल असल्याचे नमूद करण्यात आले आहे. संशयावरून सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई जिल्हाधिकारी आशीमा मित्तल, जिल्हा पुरवठा अधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महेश थेरे, पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय जालना आणि जिल्हा पुरवठा कार्यालयातील तहसीलदार सचिन यादव तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या पथकाने केली.

या प्रकरणी तहसील कार्यालयातील निरीक्षण अधिकारी (पुरवठा) महेश थेरे यांच्या तक्रारीवरून कदीम जालना पोलिस ठाण्यात जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३ व ७ अन्वये गुन्हा क्रमांक ०५२४/२०२६ दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल सदाशिव विनायक राठोड करीत आहेत.

# नाथसागरचे पाणी दुष्काळग्रस्त भागांना मिळण्यासाठी मोटारसायकल रॅली

**तातडीने सर्वेक्षण व तांत्रिक आराखडा तयार करण्याची मागणी**

गेवराई । प्रतिनिधी

नाथसागर (जायकवाडी) धरणातील पाणी उपकॅनल अथवा बंद पाइपलाइनद्वारे चकलांबा खळेगाव परिसरातील दुष्काळग्रस्त गावांना उपलब्ध करून देण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी आज परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांच्या वतीने मोठी रॅली काढण्यात आली. रॅलीनंतर जिल्हाधिकारी कार्यालय, जलसंपदा विभाग व संबंधित प्रशासनाकडे मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. चकलांबा, खळेगाव व परिसरातील अनेक गावांना गेल्या अनेक वर्षांपासून पाणीटंचाई, अनियमित पाऊस, शेतीतील उत्पादनाची अनिश्चितता तसेच जनावरांच्या चाऱ्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे टँकर, चारा छावण्या आणि इतर तात्पुरत्या उपाययोजनांपेक्षा कायमस्वरूपी पाण्याची व्यवस्था निर्माण करावी, अशी भूमिका शेतकरी व ग्रामस्थांनी मांडली.

नाथसागर जलाशयातील पाण्याचा नियोजनबद्ध पद्धतीने उपयोग करून नाथसागर चापडगाव बोधेगाव चकलांबा या दिशेने तांत्रिकदृष्ट्या योग्य मार्ग निश्चित करून चकलांबा परिसरासाठी स्वतंत्र उपकॅनल अथवा आवश्यकतेनुसार बंद पाइपलाइन/जलवाहिनी निर्माण करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.या योजनेचा लाभ केवळ एका गावापुरता मर्यादित न ठेवता





परिसरातील विविध गावांना मिळावा, यासाठी पुढील भागाचा विचार करून सर्वेक्षण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. चकलांबा रसुलाबाद हिवरवाडी मांडूळा शेकटा पौवळाचीवाडी खळेगाव बंगाली पिंपळा ब्रह्मगाव कुंभेजळगाव माटेगाव देवपिंपरी राजपिंपरी पांढरवाडी गोविंदवाडी रुई सुलतानपूर आहेर वाहेगाव आम्ला धानूरा नंदपूर खर्डा बुद्रुक कांबी लोणावळा सिंदफना चिचोंडी बोरगाव शिरसदेवी तसेच परिसरातील इतर गावांचा यामध्ये समावेश करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. या प्रस्तावासाठी जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची संयुक्त पाहणी समिती नियुक्त करून प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात यावी. प्रस्तावित मार्गाचा सर्वेक्षण नकाशा तयार करून पाण्याची उपलब्धता, भौगोलिक परिस्थिती, उंचीतील फरक, आवश्यक जलवाहक क्षमता, अंदाजित खर्च आणि संभाव्य लाभक्षेत्र यांचा सविस्तर तांत्रिक अहवाल तयार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच चकलांबा परिसरातील तलाव, बंधारे व पाझर तलाव यांना या योजनेशी जोडण्याची शक्यता तपासावी आणि अमृता नदी तसेच तिच्या उपनद्यांवरील बंधाऱ्यांमध्ये नाथसागरचे पाणी सोडण्याचे नियोजन करावे, अशी मागणीही करण्यात आली. उपकॅनल किंवा पाइपलाइन योजनेसाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळविण्यासाठी संबंधित जलसंपदा विभागाकडे तातडीने प्रस्ताव पाठवावा. या कामासाठी आवश्यक निधी राज्य शासनाच्या संबंधित सिंचन व जलसंपदा योजनांमधून उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करावा, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांनी केली. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, जलसंपदा विभाग, महसूल विभाग आणि संबंधित लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेऊन या मागणीसाठी कालबद्ध कृती आराखडा निश्चित करावा, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. ''दरवर्षी पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर टँकर, चारा छावण्या किंवा इतर तात्पुरत्या उपाययोजना करण्यापेक्षा या भागासाठी कायमस्वरूपी जलसिंचन व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे,''

अशी भूमिका आंदोलनकर्त्या शेतकरी व ग्रामस्थांनी मांडली. नाथसागरचे पाणी योग्य तांत्रिक नियोजनातून या भागापर्यंत पोहोचल्यास शेती, पिण्याचे पाणी, पशुधन आणि परिसराच्या एकूण विकासाला दीर्घकालीन आधार मिळू शकतो, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. चकलांबाखळेगाव परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांनी कायमस्वरूपी पाण्यासाठी अनेक वर्षांपासून शासनाकडे मागणी केली आहे. आता या मागणीला व्यापक स्वरूप देत विविध गावांतील शेतकरी व ग्रामस्थ एकत्र आले असून नाथसागर ते चकलांबा परिसरासाठी स्वतंत्र उपकॅनल योजना राबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस यांचा आज लातूर दुष्काळ पाहणी दौरा

लातूर। प्रतिनिधी

दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९.४५ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लातूर विमानतळावर आगमन. त्यानंतर सकाळी १० वाजता लातूर विमानतळावरून निलंग्याकडे प्रयाण करतील. सकाळी १०.३० वाजता निलंगा तालुक्यातील जाऊ येथे आगमन होऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी आणि शेतकऱ्यांशी संवाद साधतील. त्यानंतर निलंग्याहून खरोसा–लामजना परिसराकडे रवाना होतील. सकाळी ११ वाजता खरोसा–लामजना परिसरात नुकसानग्रस्त शेती आणि पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधतील. त्यानंतर खरोसा–लामजना येथून मुख्यमंत्री थेट सोलापूर जिल्ह्यातील येरमाळ्याकडे रवाना होणार आहेत.

cmyk

दैनिक
राज्य लोकतंत्र



# ना. पंकजाताई मुंडेंची यशस्वी मध्यस्थी; माजलगांव धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय स्थगित

## ना.पंकजाताई मुंडेंच्या पुढाकाराने विखे पाटील यांनी घेतली मंत्रालयात बैठक; युवा शेतकरी संघर्ष समितीने मानले आभार

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे माजलगांव (जि.बीड) धरणाची उंची वाढविण्याचा सरकारने घेतलेला निर्णय स्थगित केला आहे, याबाबत फेर सर्वेक्षण करून नंतरच निर्णय घेतला जाईल असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बैठकीत स्पष्ट केले. दरम्यान, हा निर्णय स्थगित केल्याबद्दल युवा शेतकरी संघर्ष समितीने ना. पंकजाताई तसेच विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.



राज्य सरकारने माजलगांव धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय घेतला होता यामुळे धरण परिसरातील बावीस गावच्या शेतकऱ्यांनी गेल्या काही दिवसांपासून युवा शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून हा निर्णय रद्द व्हावा यासाठी आंदोलन सुरू केले होते, काही दिवसापूर्वी जलसमाधी आंदोलनही त्यांनी केले होते. या आंदोलक शेतकऱ्यांनी माजलगांव मधील भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यां मार्फत ना. पंकजाताई मुंडे यांच्याशी संपर्क साधून हा सर्व विषय त्यांच्या कानावर घातला. ना. पंकजाताईंनी शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे ऐकून घेतले आणि यासंदर्भात लवकरच मंत्रालयात बैठक बोलवून विस्तृतपणे चर्चा करून योग्य मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करू अशी ग्वाही दिल्यानंतर शेतकऱ्यांनी जलसमाधी आंदोलन मागे घेतले होते.

पंकजाताईंचा शब्द अन् लगेच बैठक

ना. पंकजाताई मुंडे यांनी शेतकऱ्यांना शब्द दिल्यानंतर लगेचच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दालनात आज दोन्ही मंत्री महोदयांनी संबंधित शेतकरी व वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत

बैठक घेतली व धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय स्थगित केला. शेतकरी व सिंचन विभागाचे अधिकारी यांच्या वतीने संयुक्त सर्वेक्षण केल्यानंतर अहवालाअंती पुढील निर्णय घेतला जाईल तोपर्यंत माजलगाव धरण उंची वाढीच्या कामाला स्थगिती राहणार आहे. या बैठकीस विखे पाटील, ना. पंकजाताई मुंडे यांच्यासह

युवा शेतकरी संघर्ष समितीचे अजयसिंह राऊत, जगदीश फरताडे, मोहन जाधव, योगेश कानडे, तसेच बदामराव पंडित, माधव निर्मळ, नितीन नाईकनवरे, रुपाली कचरे,अर्जुन नाईकनवरे, विनायक रत्नपारखी, ईश्वर खुर्पे, शरद कचरे, शुभम महात्मे, गणेशराव शेंडगे आदी उपस्थित होते.

# बीडमध्ये ग्रामीण भागात जाणारी अवैध दारू पकडली

## स्कूटरसह १ लाख २६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात अवैध दारू विक्री आणि वाहतुकीवर कडक कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिले आहेत. या पार्श्वभूमीवर शहरातून ग्रामीण भागात दुचाकीवरून अवैध दारूची चोरटी वाहतूक करणाऱ्या एका तरुणावर शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने धडक कारवाई केली. या कारवाईत देशी-विदेशी दारू आणि स्कूटरसह एकूण १ लाख २६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार अनिल घटमाळ हे सहकाऱ्यांसह हद्दीत खाजगी वाहनाने गस्त घालत होते. यावेळी नगर नाका परिसरातून एका स्कूटरच्या डिकीतून चोरट्या मार्गाने ग्रामीण भागात दारू नेली जात असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष सापळा रचून संशयित दुचाकी अडवली आणि चालकास ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव रवींद्र भाऊसाहेब बहीर (वय २८, रा. राजुरी नवगण, जि. बीड) असे सांगितले.

देशी-विदेशी दारू व स्कूटर जप्त

स्कूटरच्या डिकीची तपासणी केली असता त्यामध्ये देशी संत्रा दारूच्या २५ बाटल्या, मास्टर डिलाईट दारूच्या १० बाटल्या, रॉयल स्टॅग दारूच्या ६ बाटल्या असा दारूसाठा आढळून आला. पोलिसांनी दारूसह १ लाख २० हजार रुपये किमतीची सुझुकी बर्गमॅन स्कूटर (क्रमांक MH 23 BG 9719) असा एकूण १ लाख २६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये शिवाजीनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, अंमलदार ज्ञानेश्वर मराडे, बाळासाहेब राहडे, दिलीप राठोड, अनिल घटमाळ, शुभम सोनवणे, विलास कांदे आणि राजाभाऊ जाधव यांनी केली. जिल्ह्यात अवैध धंदे करणाऱ्यांवर यापुढेही अशीच कडक मोहीम सुरू राहील, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# ऊसतोडणी व वाहतूक कामगारांच्या प्रश्नांसाठी आमदार सुरेश आण्णा धस यांचा पुढाकार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सकारात्मक चर्चा; प्रलंबित मागण्यांवर तातडीने कार्यवाहीचे आश्वासन

आष्टी । प्रतिनिधी

राज्यातील ऊसतोडणी व वाहतूक कामगार, मुकादम तसेच ऊसवाहतूकदारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आ.सुरेश धस यांनी पुढाकार घेत मंगळवार दि.२२ रोजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेतली. यावेळी लोकनेते गोपीनाथरावजी साखर कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत कामगारांच्या विविध मागण्यांचे निवेदन



मुख्यमंत्र्यांकडे सादर करण्यात आले.

ऊसतोडणी व वाहतूक क्षेत्राशी संबंधित हजारो कुटुंबांच्या उपजीविकेचा प्रश्न लक्षात घेऊन त्यांच्या प्रलंबित मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी आ.सुरेश धस यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे केली. कामगार, मुकादम आणि ऊसवाहतूकदारांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी तसेच आगामी ◀◀ पान ३ वर

# मध्यरात्री चोरीला गेलेली कार शिवाजीनगर पोलिसांकडून अवघ्या पावणेदोन तासांत हस्तगत

बीड । प्रतिनिधी

नागरिकांच्या सुरक्षेसाठी तत्पर असणारी 'डायल ११२' प्रणाली आणि शिवाजीनगर पोलिसांच्या तत्परतेमुळे मध्यरात्री जबरीने पळवून नेलेली चारचाकी कार अवघ्या पावणेदोन तासांत हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. दमदाटी व मारहाण करून कार पळवणाऱ्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेऊन बेड्या ठोकल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अशोक दत्तात्रय करांडे (वय ४२ वर्षे, रा. स्वभाग्य लॉन्स समोर, शांतीनिकेतन शाळेजवळ, बीड; मूळ रा. कोळगाव, ता. गेवराई) हे १९ सप्टेंबर २०२६ रोजी मध्यरात्री सुमारे ०२:०० वाजेच्या सुमारास मित्राची स्विफ्ट डिझायर कार (क्र. MH 23 -D 1424) घेऊन घरासमोर थांबले होते. त्यावेळी आलेल्या दोन इसमांनी आम्हाला तुझी गाडी दे अशी दमदाटी केली. फिर्यादीने गाडी देण्यास नकार दिल्याने आरोपींनी त्यांना मारहाण केली व गाडीतून बळजबरीने बाहेर ओढून रस्त्यावर ढकलून देत कार घेऊन पसार झाले.

घटनेनंतर फिर्यादी यांनी तात्काळ 'डायल ११२' वर संपर्क साधला. माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पथक क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी फिर्यादीकडून आरोपींचे वर्णन व पळून गेलेल्या दिशेची माहिती घेऊन शहरात तातडीने नाकाबंदी व शोधमोहीम सुरू केली. शिताफीने पाठलाग करत पोलिसांनी ◀◀ पान ३ वर

# नवीन पीक कर्जासाठी तीव्र आंदोलन छेडणार : प्रा. वैजनाथ शिंदे

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यात नवीन पीक कर्जाच्या प्रकरणांना मंजुरी मिळण्यास विलंब होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. पीक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही गेल्या दोन-तीन महिन्यांपासून अनेक कर्ज प्रकरणे प्रलंबित असल्याचा आरोप शेतकरी व सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे.

वडवणी येथील एसबीआय शाखेच्या कारभाराबाबत शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली असून, कर्ज प्रकरणांच्या




मंजुरीसाठी वारंवार टाळाटाळ केली जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. काही अशासकीय कर्मचाऱ्यांकडून पैशांची मागणी केली जात असल्याचेही आरोप करण्यात आले असून, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी ◀◀ पान ३ वर

# पावसाअभावी पाणीप्रश्नाची चिंता वाढली परतीच्या पावसावरच पाणीसाठ्याची मोठी भिस्त

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहर व परिसराची जीवनवाहिनी असलेल्या मांजरा धरणाची पाणीपातळी दिवसेंदिवस खालावत असल्याने आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या धरणावर अंबाजोगाई, लातुर औद्योगिक वसाहत, कळंब व इतर ग्रामीण भागाचा पाणीपुरवठा अवलंबून आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठा कमी होत गेल्यास पाणीटंचाईला सामोरे जावे लागू शकते.सध्या अंबाजोगाई शहराला



साधारणपणे महिन्यातून तीन वेळा पाणीपुरवठा केला जात असून,धरणाची पाणीपातळी आणखी खालावल्यास हे अंतर वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.खरीप हंगामातील जवळपास तीन साडे तीन महिने पावसाअभावी वाया गेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले ◀◀ पान ३ वर

# लग्नात विनापरवाना डी.जे. वाजवणाऱ्यावर गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

लग्नसमारंभात मोठ्या आवाजात डी.जे. (DJ) वाजवून ध्वनी प्रदूषणाचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या डी.जे. चालकावर शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने धडक कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २१ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पथक हद्दीत गस्त घालत असताना, धानोरा रोडवरील आशा टॉकीज शेजारी असलेल्या 'आर्या लॉन्स' येथे लग्नाच्या कार्यक्रमात मोठ्या आवाजात कर्णकर्कश डी.जे. वाजवला जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन चौकशी केली असता, डी.जे. चालक प्रमोद रावसाहेब साळवे (वय २३ वर्षे, रा. पेठ बीड) हा 'जे.पी. साऊंड डी.जे.' (वाहन क्र. MH-23-E-5399) च्या




माध्यमातून गाणी वाजवत होता. त्याच्याकडे ध्वनिक्षेपक वाजवण्याबाबत कोणत्याही प्रकारची वैध परवानगी नसल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आरोपी प्रमोद साळवे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ चे कलम २२३ सह ध्वनी प्रदूषण नियमन व नियंत्रण कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे (गु.र.नं. ०३०२/२०२६). पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार फर्जाना बागवान या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. लग्नकार्य किंवा इतर सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये ध्वनी मर्यादेचे आणि न्यायालयाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे; नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

# अवैध वाळू वाहतूक करणारा पिकअपसह १० लाखांचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरात विनापरवाना बेकायदेशीररित्या वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या एका वाहनावर गेवराई पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. या कारवाईत पांढऱ्या रंगाचा अशोक लिलँड 'बडा दोस्त' पिकअप आणि वाळूसह एकूण १० लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांच्या अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याच्या आदेशानुसार गेवराई पोलीस ठाण्याचे पथक




शहर व परिसरात पेट्रोलिंग करत होते. दरम्यान, पोलिसांना मिळालेल्या गोपनीय बातमीच्या आधारे दिनांक २१ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५:२० वाजेच्या सुमारास संजय नगर भागातील दारुल उलूम समोर सापळा रचण्यात आला.

त्या वेळी एक विना नंबर असलेला पांढऱ्या रंगाचा अशोक लिलँड कंपनीचा 'बडा दोस्त' पिकअप वाळू/गौण खनिजाची चोरी करून विक्रीसाठी नेत असताना मिळून आला. पोलिसांनी तातडीने सदर पिकअप व चालकास ताब्यात घेऊन १० लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल भरत शेळके ◀◀ पान ३ वर

# रस्त्यावर मध्यरात्री वाढदिवस साजरा करणाऱ्या ५ तरुणांवर पोलिस कारवाई

बीड । प्रतिनिधी

शहरात सार्वजनिक रस्त्यावर उशिरा रात्री वाढदिवस साजरा करून गोंधळ घालणाऱ्या आणि शांतता व वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या टोळक्याविरुद्ध शिवाजीनगर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. रस्त्यावर केक कापून हुल्लडबाजी करणाऱ्या पाच जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, ज्या दुचाकीवर केक ठेवला होता ती मोटारसायकलही जप्त करण्यात आली आहे. कारवाई करण्यात आलेले पाचही जण विद्यार्थी असल्याने त्यांची नावे पोलिसांनी गोपनीय ठेवली आहेत.

शहरातील एका रस्त्यावर मध्यरात्रीच्या सुमारास काही तरुण एकत्र येऊन वाढदिवस साजरा करत असल्याची माहिती 'डायल ११२' च्या नियंत्रण कक्षाला मिळाली. या माहितीच्या आधारे 'डायल ११२' च्या गस्ती पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी रस्त्यावर मोटारसायकलवर केक ठेवून काही तरुण आरडाओरड करत वाढदिवस साजरा करत असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी तातडीने कारवाई करत पाच तरुणांना ताब्यात घेतले व त्यांची मोटारसायकल जप्त केली. याप्रकरणी संबंधितांवर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११० अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

### पोलिसांचे नागरिकांना आवाहन

**शहरात कुठेही अशा प्रकारे रात्रीच्या वेळी रस्त्यावर वाढदिवस साजरा करून हुल्लडबाजी किंवा शांतता भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी तात्काळ पोलिसांना किंवा 'डायल ११२' वर माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ही धडक कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांच्या सूचनेनुसार, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. व्यंकटराम आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. शीतलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली 'डायल ११२' पथकातील पोलीस अंमलदार दिलीप राठोड यांनी केली.**

नागरिकांची झोपमोड आणि हुल्लडबाजी खपवून घेणार नाही!

अलीकडच्या काळात शहरात उशिरा रात्री किंवा मध्यरात्री मुख्य रस्त्यांवर वाढदिवस साजरी करण्याची चुकीची प्रथा वाढीस लागली आहे. वाढदिवसाच्या नावाखाली रस्त्यावर गर्दी करणे, मोठ्या आवाजात आरडाओरड करणे, फटाके व तोफा फोडणे यामुळे परिसरातील ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि लहान मुलांची झोपमोड होते. तसेच सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा पोहोचते. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, वाढदिवस साजरा करण्यास कोणाची हरकत नाही; मात्र सार्वजनिक ठिकाणी नागरिकांना वेठीस धरून किंवा ध्वनीप्रदूषण करून कायदा हातात घेणाऱ्यांची गय केली जाणार नाही. यापुढेही अशा प्रकारांवर कठोर कारवाई सुरूच राहील, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# आष्टीत २६ सप्टेंबरला शालेय स्पर्धा परीक्षा शिक्षक कार्यशाळा

आष्टी । प्रतिनिधी

शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड यांच्या वतीने 'निपुण बीड



अभियानांतर्गत' आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघातील शिक्षकांसाठी शालेय स्पर्धा परीक्षा-शिक्षक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा शनिवार दि.२६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता नगर-बीड रोडवरील मोरेश्वर मंगल कार्यालय आष्टी येथे होणार आहे.

आ.सुरेश धस यांच्या संकल्पनेतून तसेच शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बीड यांच्या आयोजनातून होणाऱ्या या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थान आ.सुरेश धस भूषविणार आहेत प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी डॉ. किरण ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk